महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक २४ जुलै, २०१५ / श्रावण २, १९३७ (शके)

(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री
(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री
(३) पर्यावरण मंत्री
(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ११०

कृष्णा नदी (जि.सांगली) प्रदूषित झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका

(१) * ६७२३ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कृष्णा नदीच्या पात्रात साखर कारखान्यांच्या बरोबरच औद्योगिक वसाहतीतील विविध उद्योगांतून रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात रात्री-अपरात्री सोडण्यात येत असल्यामुळे साटपेवाडी येथील बंधा-याजवळ पाणी दुषित होऊन हजारो मासे मृत्यूमुखी पडल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कासेगांव ते ताकारीपर्यंतच्या नदीपात्रातील पाण्याचा रंग बदलत असून पाणी काळेकुट्ट होवून त्यावर तेलकट तवंग निर्माण झाल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृष्णेचे दुषित पाणी व मोठया प्रमाणात पसरलेल्या दुर्गंधीमुळे नदीकाठच्या गावांमधील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तद्नुसार जबाबदार असणाऱ्या कंपन्या/व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) होय, चौकशी अंती नदी प्रदुषणास जबाबदार उद्योगांवर मंडळाकडून कारवाई केलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

माध्यमिक शिक्षण विभागात बनावट दस्ताऐवजाबाबत
लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार

(२) * ७२९३ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हापरिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात बनावट दस्ताऐवजाच्या आधारावर लाखो रुपयांचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्या प्रकरणाबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१५ मध्ये लक्षवेधी सूचना क्र. २४५ अन्वये प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लक्षवेधीला दिलेल्या उत्तरात तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद नांदेड व विद्यमान विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांना निलंबित करुन त्यांचेविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई सुरू करण्यात आल्याचे उत्तरात नमूद करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) व (३) या प्रकरणी श्री. संजय तेलगोटे तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद वाशिम यांना आयुक्त शिक्षण यांनी त्यांच्या दि. २.१.२०१५ रोजीच्या आदेशान्वये निलंबीत केले आहे. तसेच श्री.राम पवार तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व विद्यमान शिक्षण उपसंचालक अमरावती यांनी वाशिम जिल्हा वगळून अन्य जिल्ह्यातील शिक्षकांचे समायोजना संदर्भात अनियमितता झाली आहे किंवा कसे याबाबत आयुक्त शिक्षण यांच्यास्तरावरुन कार्यवाही होत आहे. श्री. राम पवार हे पूर्वी शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प. नांदेड या पदावर कार्यरत असतांना त्यांच्याकडून झालेल्या अनियमिततेबाबत त्यांचेविरुध्द शासनामार्फत ५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोपपत्र बजाविण्यात आलेला आहे. ही बाब अवगत केली होती. या प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत करावयाची उपाययोजना

(३) * ७५९७ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.अपूर्व हिरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या ऑनलाईन संचमान्यतेनुसार शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने अतिरिक्त ठरत असल्यामुळे सदर शासन निर्णयाचा फेरविचार करण्याच्या विचाराधिन बाबींवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने अतिरिक्त ठरविणाऱ्या सुधारित आकृतीबंधाच्या अंमलबजावणीस शासनाने स्थगिती दिली व शिक्षकेतरांचे संख्येबाबत 'जैसे थे' परिस्थिती कायम ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विहीत संख्येबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शिक्षण आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली शासनाने समिती नियुक्त केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षकेतरांच्या सुधारित आकृतीबंधास शासनाने स्थगिती दिल्यानंतरही एकाच आस्थापनेवरील काही कर्मचाऱ्यांचे वेतन अद्यापही ऑफलाईन पध्दतीने काढण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच अनुदानित शाळांमध्ये समायोजनाच्या मुद्यांवर शिक्षक भरती बंद असून या रिक्त जागांमुळे त्याचा गुणवत्तेवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, दैनंदिन शालेय कामकाज व व्यवस्थापनाच्यादृष्टीने अत्यंत अन्यायकारक व मोठया संख्येने मान्यता प्राप्त कर्मचारी अतिरिक्त ठरविणारा हा सुधारित आकृतीबंध रद्द करावा, अशी मागणी होत असल्यामुळे शासनाने शिक्षकेतरांचा प्रस्तुत सुधारित आकृतीबंध रद्द करणेबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अद्याप कार्यवाही सुरु आहे.

(२) जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) होय हे खरे आहे.

(४) जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे निर्देश देण्यात आलेले असल्यामुळे काही अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन ऑफलाईन पध्दतीने काढण्यात येत आहे.

(५) हे खरे नाही.

(६) व (७) आकृतीबंधाबाबत सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.

शासकिय आश्रमशाळा वरखंडा दापचरी (ता.तलासरी, जि.पालघर)
येथे क्रीडा संकुल उभारण्याबाबत

(४) * ६८११ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.राहुल नार्वेकर : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील तलासरी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुग्ध प्रकल्प दापचरी यांच्या अखत्यारीत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा वरखंडा दापचरी येथील २० एकर जागा क्रीडा संकुलासाठी प्रस्तावित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने क्रीडा संकुलाच्या प्रस्तावास तात्काळ मंजुरी मिळणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.
(२), (३) व (४) ता. तलासरी जि. पालघर या क्रीडा संकुलासाठी आवश्यक असलेली जागा अद्याप प्राप्त झालेला नाही. तथापि सदर जागा उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागाच्या
भ्रष्ट व अनागोंदी कारभाराबाबत

(५) * ८०६८ **श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उचाट शिक्षण संस्थेच्या इंग्लिश मिडीयम स्कूल, उचाट, ता.वाडा. जि. पालघर या शाळेस स्वयं अर्थसहाय्यीत शाळा सुरु करण्यास शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार प्रथम मान्यतेसाठी प्रस्ताव शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे केव्हा दाखल करण्यात आला आहे,
(२) मा. शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे केव्हा सादर केला होता, व या प्रस्तावावर शिक्षणाधिकारी म्हणून कोणत्या अधिकाऱ्याने सही केली आहे,
(३) सदरचा प्रस्ताव पुर्ततेसाठी शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग, मुंबई यांनी ठाणे जिल्हा परिषदेस केव्हा परत केला आहे,
(४) सदर प्रस्तावाबाबत अद्याप कार्यवाही न होण्याची व प्रकरण दाबून ठेवण्याची कारणे काय आहेत,
(५) तसेच कामात हलगर्जीपणा करणाऱ्या व पैशासाठी प्रकरण दाबून ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) उचाट शिक्षण संस्थने सदर शाळेच्या प्रथम मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांचकडे दिनांक १२.६.२०१४ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे.

(२) तत्कालिन शिक्षणाधिकारी यांनी सही करुन सदर प्रस्ताव दिनांक ३०.९.२०१४ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे सादर केला आहे.

(३) सदरचा प्रस्ताव पूर्ततेसाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी दिनांक ११.११.२०१४ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे सादर केला आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी संबंधितांकडून खुलासा मागविण्यात येत असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे ट्रामा सेंन्टर सुरु करण्याबाबत

(६) * ७३२८ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया, श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे ११ कोटी ६० लक्ष रु. खर्च करुन ट्रामा सेंन्टर बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सेंन्टर करिता आवश्यक असलेला कर्मचारी वर्गाकरिता ३०१ पदांच्या मागणीचा प्रस्ताव वैद्यकीय प्रशासनाकडून शासनाला प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १० महिन्यांपासुन इमारत तयार असतांना ट्रामा सेंटर सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ट्रॉमा सेंटर लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) असल्यास, ट्रॉमा सेंटर सुरु करण्यासाठी तसेच उपरोक्त पदांच्या मंजुरीकरिता किती कालावधी अपेक्षित आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ट्रामा केअर सेंटरचे रुग्णालय प्रशासनास अद्यापपर्यंत हस्तांतरीत करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

संस्थेतील ट्रामा केअर सेंटरच्या इमारतीचे बाह्य विद्युतीकरण, आय.सी.सी.युनिट, वाढीव स्थापत्य कामे इत्यादींचे सुधारित प्रस्ताव शासनास सादर केले आहेत. सदरहू प्रस्ताव सहमतीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास पाठविण्यात आले आहेत. तसेच नविन पदनिर्मितीच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

(४) व (५) संस्थेतील ट्रामा केअर सेंटरच्या इमारतीचे बाह्य विद्युतीकरण, आय.सी.सी.युनिट, वाढीव स्थापत्य कामे इत्यादींच्या सुधारीत प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभाग व सचिव समितीने मान्यता दिल्यास विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येतील.

तसेच पदनिर्मितीचा प्रस्तावास वित्त विभाग, उच्चस्तरीय समिती व मंत्रीमंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरहू मान्यता मिळविण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुख्याध्यापकांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याबाबत

(७) * ८११० डॉ.अपूर्व हिरे, श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३८४ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेप्रमाणे (कॅशलेस) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सदरची योजना लागू करण्याबाबतची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या लोकप्रतिनिंधींनी व कार्याध्यक्षांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) कॅशलेस योजना शिक्षक शिक्षकेत्तरांना लागू करण्याबाबत तातडीने निर्णय घेऊ असे आश्वासन मा. शिक्षणमंत्री महोदय यांनी शिक्षक परिषदेस दिले होते, हे खरे आहे काय,

(३) दिनांक ७ एप्रिल, २०१५ रोजी सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाने मुळ निर्णयातील त्रुटी दूर करुन कॅशलेस योजना लागू करण्याचा निर्णय घेवू असे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) राज्यातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्यासाठी गृह विभागाने लागू केलेली "महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना" अंमलबजावणीमध्ये असणाऱ्या त्रुटीबाबत गृह विभागाकडून माहिती घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना अंशदायी पेन्शन योजना लागू करणेबाबत

(८) * ७५१२ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना अंशदायी पेन्शन योजना लागू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांची खाते उघडण्यात येवून त्यांच्या खात्यावर देय होणारी रक्कम जमा करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, अंशदायी पेन्शन योजनेत येणाऱ्या अशा शिक्षक कर्मचाऱ्यांची खाते न उघडणे व त्यांची रक्कम जमा न होणे याबाबतची सविस्तर कारणे काय आहेत,
(४) उक्त प्रकरणी शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) नवीन परिभाषित अशंदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीस मा. उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली असल्याने खाते उघडणे व रकमा जमा करणे ही कार्यवाही पूर्ण होवू शकलेली नाही.

तथापि, स्थगिती आदेशापूर्वी काही शिक्षक कर्मचाऱ्यांची नवीन अंशदायी पेन्शन योजनेत खाती उघडण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

एकरुख (जि.सोलापूर) येथील ग्रामीण भागातील व शहरातील पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत

(९) * ७०२७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकरुख (जि.सोलापूर) तलावामध्ये अत्यंत कमी पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे ग्रामिण भागातील व शहरातील पाणी पुरवठा पूर्णपणे बंद झाल्यामुळे २ ते २.५० लाख नागरीक पिण्याच्या पाण्यापासून वंचित असल्याचे दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकरुख उपसा सिंचन योजनेचे ८० ते ८५ टक्के काम पूर्ण झाल्याने कारंबा कालव्यातून उजनीचे पाणी सोडून तलावामध्ये साठवणूक केल्यास पाण्याची समस्या मिटणार या मागणी बाबत जिल्हा परिषद सदस्य यांनी मा.पाटबंधारे मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे नाही.

(२) होय.

(३) दि. ०३ फेब्रुवारी, २०१५ च्या बैठकीत मा. मंत्री जलसंपदा यांनी कारंबा पंपगृह परिचालनाचा व देखभाल दुरुस्तीचा खर्च करणेसाठीचा महापलिकेचा ठराव घ्यावा तसेच, भीमा (उजनी) प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावामध्ये कारंबा पंपगृहाचा अंतर्भाव करुन सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व मान्यता मिळाल्यानंतर कारंबा पंपगृहाचे बांधकाम करावे, असे निर्देश दिले आहेत, तथापि, अद्याप महापालिकेकडून ठराव अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवजीवन शिक्षण संस्थेतील मुख्याध्यापक यांनी बोगस शिक्षक नेमल्याबाबत

(१०) * **७६८२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवजीवन शिक्षण संस्थेतील मुख्याध्यापक यांच्यावर बोगस शिक्षक नेमणे, पालकांकडून अतिरिक्त फी उकळणे आणि शिक्षकांचा छळ करणे याबाबत झालेल्या आरोपांची शिक्षण निरिक्षकांनी चौकशी करुनही दोषी मुख्याध्यापक व संस्थेवर कोणतीही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच बोगस शिक्षकांच्या नेमणुका रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नवजीवन विद्यालय, मालाड या राजस्थान रिलिफ सोसायटी संचलित शाळेतील अनियमिततेसंदर्भात शिक्षण निरिक्षक (पश्चिम) बृहन्मुंबई यांनी सुनावणी आयोजित करुन नियमानुसार कारवाई करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) पुढीलप्रमाणे :

अ) माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठी दिनांक २० जून, २०१४ च्या शासन निर्णयान्वये रिक्त पदांची भरती, वैयक्तिक मान्यता याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे. तर बृहन्मुंबई करीता दिनांक २०.८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे.

ब) उच्च माध्यमिक शिक्षकासाठी दिनांक १९.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे.

क) शाळांची ऑनलाईन संचमान्यता करण्यात येते.

ड) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन (शालार्थ) या संगणक प्रणालीद्वारे करण्यात येते.

कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील भूजलसाठा वाढविण्यासाठी भूगर्भातील जलस्त्रोतांचे संवर्धन करण्याबाबत

(११) * ६८५० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यात पाणीटंचाईची समस्या भेडसावत असल्याने, या समस्येवर मात करण्यासाठी तालुक्यातील ५१ पाडे आणि गावांमध्ये बोअरवेलचा प्रस्ताव तयार करुन, मासानोली आदिवासी पाडा, उशीद-अराळे, सांगोडा, अंताडे, नारिवली, पिसवली, नाळीबी, मानिवली आदिवासी पाडा, ठाकूरपाडा, आणे, बागसई, काकडपाडा, फळेगाव, वैतागवाडी, मानिवली, आदिवासी पाडा, कांबा पठार, आणि रुंडे या १५ ठिकाणी जिल्हापरिषदेच्या निधीतून बोअरवेल खोदण्यात आल्या, मात्र यातील फक्त पाच ठिकाणी पाणी लागले असून, इतरत्र दहा ठिकाणी २०० फुटावर सुध्दा पाणी लागलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील भूजलसाठा घटल्याने, पाणी पातळी खोलवर गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण तालुक्यातील भूजलसाठा वाढविण्यासाठी व भूगर्भातील जलस्त्रोतांचे संवर्धन करण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) सन २०१५ मध्ये संभाव्य पाणी टंचाई निवारण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून तयार करण्यात आलेल्या कृती आराखडयामध्ये कल्याण तालुक्यातील ५१ गावे/पाडयांमध्ये नवीन विंधणविहीर घेणे ही उपाययोजना प्रस्तावित करण्यात आली होती. सर्वेक्षणांती १५ गावे/पाड्यापैकी ९ गावे/पाड्यामध्ये नवीन विंधन विहीर खुदाई करण्यात आलेली आहे. त्यापैकी ८ विंधन विहीरींना पाणी लागले असून केवळ १ ठिकाणी विंधन विहीर अयशस्वी झाली आहे.

(२) भूजल पातळीचा अभ्यास करण्याकरिता कल्याण तालुक्यात एकूण ३ निरीक्षण विहीरी निश्चित करण्यात आलेल्या आहेत. माहे मार्च, २०१५ मध्ये भूजल पातळीत वाढ झालेल्या एकूण निरीक्षण विहीरींची संख्या २ इतकी असून एका निरीक्षण विहिरीत नगण्य घट आढळून आली आहे.

(३) भूजल पातळीमध्ये वाढ होण्याकरीता कल्याण तालुक्यामध्ये शासनामार्फत जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रम अंतर्गत विविध योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातून केशरी रंगाच्या शिधापत्रिका धारकांना धान्य देण्याबाबत

(१२) * ७०५९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केशरी रंगाच्या शिधापत्रिका धारकांना माहे ऑक्टोबर, २०१४ पासून राज्य शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातून कोणत्याही प्रकारचा अन्न धान्य पुरवठा न करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असल्याने सुमारे १ कोटी ७० लाख लाभधारक अन्न धान्य पासून वंचित असल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त निर्णयामुळे सुमारे १ कोटी ७० लाख गरीब व गरजू नागरीकांवर फार मोठी आपत्ती ओढवलेली असल्यामुळे केशरी रंगाच्या शिधापत्रिका धारकांना अन्नधान्य पुरवठा पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) दारिद्रय रेषेखालील लाभार्थी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आले असून त्यांना सवलतीच्या दराने धान्य पुरवठा करण्यात येतो. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट न झालेल्या केशरी रंगाच्या शिधापत्रिका धारकांना माहे नोव्हेंबर, २०१४ पासून अन्नधान्याचा लाभ देता आला नाही. सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

(१३) * ७८६४ श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी विविध माध्यमातून ९६ लाख रुपये जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्याचे निरुत्साही धोरण, नियोजनाचा अभाव व कामाची चालढकल यामुळे वर्षभरात कामे न झाल्याने निधी शासनाला परत गेला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधिताविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप चौकशी वा कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(५) प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित निधीतून कोणती कामे घेण्यात येणार होती व ती न घेण्याची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

सन २००९-१० ते २०११-१२ पर्यंत स्थानिक विकास निधीअंतर्गत विविध मतदार संघातील कामाकरिता एकूण रुपये ३,०६,९२,७८७/- प्राप्त झाले होते. त्यापैकी रुपये, २,१०,७५,७९०/- ची कामे पूर्ण करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

सन २००९-१० ते २०११-१२ या कालावधीतील एकूण लोकप्रतिनिधी स्थानिक विकास निधीमधून रुपये ३,१३,९६,८८८/- एवढया रक्कमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. त्यासाठी रुपये ३,०६,९२,७८७/- इतका निधी प्राप्त झाला होता. त्यामधून अखर्चित राहीलेली रक्कम रुपये ९६,१६,९९७/- शासनखाती जमा करण्यात आली आहे.

यामध्ये विविध कामांसाठी प्राप्त रक्कमेतून विंधन विहीर, नळ पाणीपुरवठा योजनेची कामे करण्यात आली आहेत. तथापि, विंधन विहीरी कोरडया जाणे/हातपंप बसविणे, जागेची अडचण/ कोरडया गेलेल्या विहीरीवर हातपंप/कट्टे बांधकाम न झाल्यामुळे निधी काम होऊन शिल्लक राहीला होता. त्यामुळे शिल्लक राहीलेला रुपये ९६,१६,९६७/- इतका निधी परत करावा लागला आहे.

जिल्हा परीषदेतील अधिकाऱ्यांमुळे वा नियोजनाच्या अभावामुळे अथवा अन्य कारणामुळे सदर निधी शिल्लक राहीलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) उल्लेखित निधीमधून विंधन विहीर व नळ पाणीपुरवठा योजनेची कामे प्रस्तावित होती. सदर कामे करण्यात आली आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात उत्तर पत्रिकेची छपाई करुन ३७ लक्ष रुपयांचा केलेला अपहार

(१४) * ७९१९ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र जैन : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात उत्तर पत्रिकेचा मोठा साठा असुनही नवीन उत्तर पत्रीकेची छपाई करुन ३७ लक्ष रुपयांचा अपहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उत्तरपत्रिकांची छपाई विद्यापीठातील मुख्य अधिकाऱ्यांच्या जवळच्या नातलगाने केली, हे खरे आहे काय,

(३) तसेच विद्यापीठाच्या अधिकाऱ्याच्या दालनावर व नवीन वाहन खरेदीवर ७५ लक्ष रुपयाचा वारेमाप खर्च केला आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास प्रश्न क्र. १, २ व ३ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या पीएचडी पात्रताधारक (पदे) परिक्षेची व एम.ए.भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांना हॉल तिकिटे वेळेवर मिळाली नसल्याबाबत

(१५) * ७७२५ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापिठाद्वारे माहे एप्रिल, २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या पीएचडी पात्रताधारक (पदे) परिक्षा, एम.ए.भाग १ व एम.ए.भाग २ च्या विद्यार्थ्यांना हॉल तिकिटे वेळेवर मिळाली नसल्याने परिक्षेच्या दिवशी गोंधळ निर्माण झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) होय, सदर प्रकरणी चौकशी चालू आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड, दौंड या शहरातील कारखान्यांच्या दुषित पाण्यामुळे मुळा-मुठा नदी प्रदुषित झाल्याबाबत

(१६) * ७९६१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल तटकरे, श्री.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, पिंपरी-चिंचवड, दौंड या शहरातील कारखान्यांच्या दुषित पाण्यामुळे मुळा-मुठा नदी प्रदुषित होवून हेच पाणी पुढे उजनी नदीत मिसळत असल्याने उजनी जलाशयातील पाणी प्रदुषित झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे दुरगामी परिणाम सर्वसामान्य नागरीक, शेती, पिके, गुरे-ढोरे यांच्यावर होत असल्याची बाब प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या अहवालातून शासनाच्या निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मुठा-मुळा व भीमा नदीचे मुख्यत्वे: महानगरपालिकेतुन निघणाऱ्या सांडपाण्यामुळे प्रदुषण होत आहे.

(५) पुणे व पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेस नागरी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे निर्देश दिले असून या महानगरपालिकांवर कायदेशीर कारवाई सध्या सुरु आहे.

राज्यातील २८१ सरकारी हॉस्पिटले आणि आरोग्य केंद्रातील विविध औषधांचा दर्जा निकृष्ट असल्याबाबत

(१७) * ६८८२ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती स्मिता वाघ, श्री.अनिल तटकरे : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुजरात, पंजाब हिमाचल प्रदेश, उत्तरांचल आणि कर्नाटक येथून निकृष्ट दर्जाची औषधे महाराष्ट्रात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य राज्यातून येणारी सुमारे १२.२६ टक्के औषधे, निकषाचे उल्लंघन करणारी असल्याचे एफडीच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एफडी प्रशासनाने राज्यभरातील २८१ सरकारी रुग्णालये आणि आरोग्य केंद्रातील विविध औषधांच्या चाचण्या घेतल्या असता ३३५ औषधे निकृष्ट दर्जाची असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निकृष्ट दर्जाच्या औषधावर बंदी आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) अंशत: खरे आहे.

अन्न व औषधे प्रशासनाने बाजारात उपलब्ध असलेल्या औषधांचे नमुने घेऊन चाचणी व विश्लेषण केले असता हिमाचल प्रदेश व उत्तराखंड राज्यातील उत्पादकांचे नमुने अधिक प्रमाणात अप्रमाणित घोषित झाल्याचे आढळले.
(२) हे खरे नाही.

अन्न व औषधी प्रशासनातर्फे माहे एप्रिल, २०१४ ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत इतर राज्यातील उत्पादित एकूण १९७३ नमुन्यांचे विश्लेषण केले होते. त्यापैकी २४२ नमुने अप्रमाणित घोषित झाले असून त्याची टक्केवारी १२.२६ टक्के इतकी होती.

तसेच माहे एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत इतर राज्यातील उत्पादित एकूण ३३९६ नमुन्यांचे विश्लेषण केले असून त्यापैकी ३६६ नमुने अप्रमाणित घोषित झाले असून, त्याची टक्केवारी १०.७७ टक्के इतकी आहे.

एप्रिल, २०१५ ते जून २०१५ या कालावधीत इतर राज्यातील एकूण ९२३ नमुन्यांचे विश्लेक्षण केले त्यापैकी ९१ नमुने अप्रमाणित घोषित झाले असून त्याची टक्केवारी ८.९७ टक्के आहे.

उपरोक्त टक्केवारी ही चाचणी व विश्लेषणासाठी घेतलेल्या नमुन्यांच्या प्रमाणाची असून ती बाजारात उपलब्ध असलेल्या औषधांशी संबंधित नाही.
(३) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०१५ मध्ये अन्न व औषध प्रशासनाद्वारे शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील औषध भांडाराची तपासणी माहिम राबविण्यात आली होती त्यावेळी एकूण २७० शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील एकूण ३५२ औषधी नमुन्यांचे विश्लेषण केले असता त्यातील २२ नमुने अप्रमाणित घोषित झाले आहेत.

(४) अप्रमाणित घोषित औषध नमुन्यांप्रकरणी उत्पादकांच्या स्तरापर्यंत चौकशी व तपास करण्यात येवून अन्न व औषध प्रशासनामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते.

अ) केंद्र शासनाच्या धोरणानुसार अप्रमाणित अहवालावर उत्पादकांविरुध्द न्यायालयीन कारवाईचे आदेश देण्यात येतात.

ब) संबंधित राज्याच्या औषध नियंत्रकास परराज्यातील औषधासंदर्भात उत्पादकावर प्रशासकीय कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतात.

क) अप्रमाणित आढळलेल्या औषध नमुन्यांबाबत औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत तरतुदीनुसार प्रशासकीय व न्यायालयीन कारवाई केली जाते. एप्रिल २०१४ ते जून २०१५ या कालावधीत इतर राज्यातील एकूण ११४ प्रकरणी उत्पादकावर खटला आदेश देण्यात आलेले आहेत.

ड) राज्यातील विक्रीकरीता उपलब्ध असलेला अप्रमाणित औषधी समुहाचा साठा बाजारातून परत मागविणेबाबत कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विकसनशील शहरांतील प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाची उपाययोजना

(१८) * ७४२१ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय पर्यावरण विभागाने ८८ औद्योगिक क्लस्टरच्या सर्वेक्षणात ४३ क्लस्टर्स प्रदुषणाच्या बाबतीत अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेले असून, त्यात राज्यातील चंद्रपूर, औरंगाबाद, नवी मुंबई आणि डोंबिवली या चार औद्योगिक विभागांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरांतील जीवनमान अधिक सुखकारक व्हावे, यासाठी 'स्मार्ट सिटी'ची संकल्पना राबविण्याचा संकल्प केंद्र आणि राज्य सरकारने सोडलेला असतानाच, औद्योगिक विभागातील औरंगाबाद, नवी मुंबई, डोंबिवली आणि चंद्रपूर या चार शहरांनी प्रदूषणाची धोकादायक पातळी ओलांडले असल्याचे केंद्रिय पर्यावरण विभागाने केलेल्या सर्वेक्षणावरुन दिनांक २० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक शहरांतील प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रश्न भाग - २ मध्ये उल्लेख केलेल्या औद्योगिक शहरांबाबतीत प्रदूषण कमी करण्याबाबत कृती आराखडा तयार करण्यात आलेल्या असून, त्याबाबतची अंमलबजावणी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्याच्या पुरवठा विभागातील गैरव्यवस्थापनामुळे धान्य वाहतुकीच्या कामात कोट्यवधी रुपयांचे होत असलेले नुकसान

(१९) * ७४८० श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा पुरवठा विभागातील धान्य वाहतुकीच्या गैरव्यवस्थापनामुळे शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान होत असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव अन्न, नागरी पुरवठा यांच्याकडे दि. ३१/३/२०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींना केलेल्या कार्यवाहीबाबत कळविण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत प्राप्त तक्रारीवरुन दोषीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे आहे.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने उपायुक्त (पुरवठा), औरंगाबाद विभाग यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दि.२० एप्रिल, २०१५ रोजी देण्यात आल्या. याबाबतचा अहवाल दि. ०९ जूलै, २०१५ रोजी प्राप्त झालेला आहे.

(३) व (४) लोकप्रतिनिधींनी त्यांच्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०३ जुलै, २०१५ रोजी अंतरिम उत्तर पाठविण्यात आले आहे. प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने तपशीलावार उत्तर देण्यात येत आहे.

(५) प्राप्त झालेल्या अहवालावरुन जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या गैरव्यवस्थापनामुळे शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. त्यामुळे दोषीविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामधील शहरातील वायुप्रदूषाणाला आळा घालण्याबाबत

(२०) * ८२८५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती दिप्ती चवधरी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, अमरावती इत्यादिसह १८ शहरामधील वायुप्रदूषण मापदंडापेक्षा अधिक असल्याची माहिती मा.केंद्रीय पर्यावरण मंत्र्यानी मान्य केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील वायुप्रदूषाला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई शहरामध्ये शीव व वांद्रे या दोन ठिकाणच्या परिसरातील हवेच्या गुणवत्तेचे संनियंत्रण करीत आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे राज्यातील उद्योगांना हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा उभारण्याच्या प्रमुख अटींसह इतर शर्तीयुक्त संमतीपत्र देण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांद्वारे संबंधित उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन अटी व शर्तींचे अनुपालनबाबत तपासणी करण्यात येत असते. अनुपालनामध्ये त्रुटी आढळून आल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे रीतसर कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अन्नसुरक्षा विधेयकांतर्गत एपीएल व बीपीएल योजनेअंतर्गत नागरिकांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत

(२१) * **८१८८ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्नसुरक्षा विधेयकांतर्गत एपीएल व बीपीएल ही रेशन दुकानांवरुन अन्नधान्य देण्याची शासनाची योजना असुन या योजनेअंतर्गत समाजातील कमी उत्पन्न घटकातील नागरिकांना माफक दरात जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा करण्यात येत असुन सध्या योजनेअंतर्गत नागरिकांना अत्यल्प प्रमाणात जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत सध्या देण्यात येणारा अन्नधान्य पुरवठा पुर्वीच्या आघाडी शासनाच्या मानाने कमी असुन त्यामध्ये लाभार्थी नागरिकांमध्ये कपात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याचे राज्यशासन सदरहू योजनेमधील लाभार्थी व अन्नधान्य पुरवठा पुर्वीप्रमाणेच अथवा त्यामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) नाही.

(२) महाराष्ट्र राज्यात दि. १ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. सदर अधिनियमांतर्गत दिलेल्या इष्टांकाच्या प्रमाणात दि. १.२.२०१४ पासून पात्र लाभार्थ्यांना अधिनियमामध्ये विहित केलेल्या सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

(३) व (४) लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये लाभ घेत असलेल्या परंतू राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत विहित केलेल्या इष्टकांच्या मर्यादेमुळे ज्या लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ देता आला नाही, त्या लाभार्थ्यांना माहे ऑक्टोंबर, २०१४ पर्यंत एपीएलच्या दराने व परिमाणात अन्नधान्याचा लाभ देण्यात आला आहे. त्यानंतरच्या कालावधीमध्ये सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याच्या पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

पेण (जि.रायगड) तालुक्यामध्ये आईस्क्रीम मधून झालेली विषबाधा

(२२) * **६७१५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील आईस्क्रीम दुकानातून खरेदी केलेल्या आईस्क्रीममुळे माहे मार्च २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पेण शहरातील नागरीकांना आईस्क्रीम खाल्याने विषबाधा झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तक्रारी अर्ज केल्यानंतर संतोष आईस्क्रीम या दुकानावर धाड टाकून मुदतबाह्य झालेले आईस्क्रिम जप्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुकान मालकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही तथापि, तक्रार प्राप्त झाल्यानंतर रायगड कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी मे, संतोष आईसिक्रम सेंटर, वडगाव रोड, चिंचपाडा, ता.पेण, जि रायगड या पेढीची तपासणी करुन "मिडीयम फॅट फ्रोजन डेझर्ट मँगो संडे" या अन्न पदार्थांचा सर्व्हेक्षणासाठी नमुना घेतला होता. सदर नमुना प्रमाणित घोषित झाला आहे.

तसेच, पुरवठादार पेढी मे. दिबाह इन्टरप्रायझेस, पेण यांच्या वाहनाची तपासणी करुन "मिडीयम फॅट फ्रोजन डेझर्ट मँगो संडे" या अन्न पदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेऊन उर्वरित साठा एकूण १२ बॉक्स किंमत रु. ३,३६०/- चा. साठा विक्रीसाठी प्रतिबंधित करण्यात आला होता. तथापि, विश्लेषणासाठी घेतलेला नमुना प्रमाणित घोषित झाल्याने प्रतिबंधीत साठा विक्रेत्यास खुला करण्याचे आदेश देण्यात आले.

(३) सदर पेढीविरुध्द पदावधित अधिकारी यांचेकडे सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या तपासणी दरम्यान, तक्रारी व्यतिरिक्त आढळून आलेल्या अन्य त्रुटींच्या अनुषंगाने, अन्न सुरक्षा अधिकारी यांनी कलम ६९ अंतर्गत तडजोड अर्ज दाखल केला होता. सदर प्रकरणी सुनावणी होवून पेढीस रु. १०,०००/- दंड आकारण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात न आल्याबाबत

(२३) * ६६८८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एम.पी.एस.सी) सन २०१३ मध्ये राज्य सरकारच्या विविध खात्यांतर्गत रिक्त असलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी गट-ब पदाच्या भरतीसाठी परीक्षा घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परीक्षेचा मार्च २०१४ मध्ये निकाल जाहीर होऊन गुणानुक्रमे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जलसंपदा विभाग या विभागाची शिफारसपत्रे उमेदवारांना देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागात शिफारस होऊनही १५६ उमेदवारांना एक वर्षापासून नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांनी या उमेदवारांना एका महिन्याच्या आत नियुक्त्या देण्याचे आश्वासन माहे मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या उमेदवारांना आश्वासनाप्रमाणे नियुक्त्या मिळालेल्या नाहीत हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या उमेदवारांना तातडीने नियुक्त्या देणे बाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.

(२) होय.

(३), (४), (५) व (६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांना दिनांक ३१.३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये वैद्यकीय व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे सादर करणेबाबत कळविण्यात आले होते, त्यानुषंगाने, ज्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता व इतर प्रमाणपत्रे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर केलेली आहेत, अशा एकूण १०३ उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक १०.७.२०१५ च्या आदेशान्वये नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

दक्षिण मुंबईतील अल्पसंख्यांक शाळा विद्यार्थी प्रवेशाविषयीचे नियम धुडकावत असल्याबाबत

(२४) * ७८३५ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील १२७ पैकी ८७ अल्पसंख्यांक शाळा विद्यार्थी प्रवेशाविषयीचे नियम धुडकावत असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ दक्षिण मुंबईतीलच नव्हेतर संपूर्ण राज्यातील अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या जवळपास २३०० शैक्षणिक संस्थांची चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास अल्पसंख्यांक दर्जाच्या नावाखाली सुरु असलेले गैरव्यवहार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) संस्थांकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात इंग्रजी शाळांची संख्या वाढविण्याबाबत

(२५) * ७१५१ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इंग्रजी शिक्षण घेण्याकरीता मोठया प्रमाणात इंग्रजी शाळेत प्रवेश घेण्याचे प्रमाण वाढले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन अधिक इंग्रजी शाळेस मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन इंग्रजी माध्यमाच्या शाळा स्थापन करणे तसेच मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याबाबत शासनाने प्रस्ताव मागविले होते. त्यानुसार पात्र ठरणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या ८७५ नवीन शाळांना व १२९ शाळांना दर्जावाढ करण्यास शासन निर्णय दि. २ जून, २०१५ अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामध्ये फ्री स्टाईल स्केटींग या खेळात राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवणाऱ्या खेळाडूंना प्रदिर्घ कालावधीपासून सर्टिफिकेटस न दिल्याबाबत

(२६) * ८०५१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये फ्री स्टाईल स्केटींग या खेळात राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवणाऱ्या खेळाडूंना स्केटींग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या क्रीडा संघटनेकडून किंवा क्रीडा विभागाकडून प्रदिर्घ कालावधीपासून सर्टिफिकेटस न दिल्यामुळे शेकडो गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये शासनाकडे वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील फ्री स्टाईल स्केटींगमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२), (३) व (४) फ्री स्टाईल स्केटींग स्पर्धेचे आयोजन क्रीडा विभागाकडून करण्यात आलेले नाही. या संदर्भात स्केटींग आसोसिएशन ऑफ महाराष्ट्र या क्रीडा संघटनेकडून खुलासा मागविला असता संघटनेने फ्री स्टाईल स्केटींग या खेळ प्रकाराचे भारतात प्रथमच आयोजन करण्यात आल्याचे कळविले आहे. तसेच सदर खेळ प्रकाराचा दर्जा व गुणवत्ता यांची सविस्तर पडताळणी राष्ट्रीय फेडरेशनद्वारे करण्यात आल्यानंतर संबंधित खेळाडूंना आवश्यक ती प्रमाणपत्रे जिल्हा संघटनांद्वारा वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव, (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन मधील अधिव्याखात्याचे रिक्त असलेली पदे

(२७) * ८१३८ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमाक ४०५८ ला दि. १९/३/२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन मध्ये अधिव्याख्याताची बरीच पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अधिव्याख्यातांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता रिक्त असलेल्या अधिव्याख्यातांची पदे भरणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव या संस्थेत ४५ मंजूर पदे असून त्यापैकी २३ नियमित भरलेली पदे व ०६ पदांवर कंत्राटी अधिव्याख्यात्यांची नेमणूक करुन २९ पदे भरण्यात आली आहेत. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तासिका तत्वावर अध्यापकांची नेमणूक करुन अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्यात येतो.

(३) शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता ही पदे राज्यस्तरीय असल्याने सर्व शासकीय तंत्रनिकेतनातील रिक्त असलेल्या अधिव्याख्याता या पदाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

(४) महाराष्ट्रातील शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्यात्यांची रिक्त पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी शाळांचे अनुदान केंद्राने बंद केल्याबाबत

(२८) * ७३७१ श्री.विजय गिरकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ४३ तर पालघर जिल्ह्यातील ५ तालुक्यात केंद्र सरकारच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान अंतर्गत मॉडेल इंग्रजी स्कूल सन २०१२ पासून सुरु करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांना देण्यात येणारा निधी केंद्राने बंद केल्याने राज्यशासनाने या शाळा बंद करण्याचा निर्णय माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बंद करण्यात आलेल्या शाळातील आदिवासी विद्यार्थ्यांना इतरत्र सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय

(२) होय

(३) व (४) तालुक्यातील गट शिक्षणाधिकारी यांनी जव्हार, मोखाडा, डहाणू, विक्रमगड व तलासरी या तालुक्यातील मे, २०१५ मध्ये बंद झालेल्या मॉडेल स्कूल मधील आदिवासी विद्यार्थ्यांना इतरत्र सामावून घेण्यात आले आहे. प्रवेशापासून आदिवासी विद्यार्थी वंचित नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात गाईडबाबतचे निकष शिथील करण्याबाबत

(२९) * ६९३६ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) विद्यापीठातील अथवा शैक्षणिक संस्थांमधील संचालक, विभागप्रमुख तसेच प्राचार्य हे पीएचडी अर्हतापात्र असले पाहिजेत अशी भुमिका घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पीएचडीसाठी नोंदणी करणाऱ्यांची संख्या वाढत असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पीएचडी करणाऱ्यांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच गाईड उपलब्ध नसल्यामुळे २५७६ विद्यार्थी गाईडच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त विद्यापीठातून गाईडबाबतचे निकष शिथील करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) संशोधन मार्गदर्शकास मान्यता देण्याबाबतचे काही निकष विद्यापीठ स्तरात शिथिल करण्यात आलेले आहेत.

(५) कार्यवाही करण्यात आलेली आहे.

पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे नवीन वसतीगृह बांधण्याबाबत

(३०) * ७९९९ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या वसतिगृहात क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी राहत असल्याचे तसेच गेल्या २० वर्षात या वसतिगृहाची क्षमता वाढविण्यासाठी कोणतेच प्रयत्न केले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुणे येथे शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासासाठी नवीन वसतिगृह बांधण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

जेनरिक औषधावर एमआरपीचे बंधन घालण्याबाबत

(३१) * ७२२४ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जेनरिक औषधांवर एमआरपीचे बंधन नसल्यामुळे आठ ते दहापट दराने ही औषधे विकली जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने जेनरिक औषधा संदर्भात (मेडिकल कौन्सील रेग्युलेशन २००२) नुसार डॉक्टरांनी औषधी जेनरिक नावाने लिहणे सक्तीचे केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जेनरिक औषधावर एमआरपीचे बंधन घालणे तसेच ब्रॅडनेम ऐवजी घटकच डॉक्टरांनी लिहिण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ परिच्छेद १३ व २० नुसार प्रत्येक औषधासाठी एम.आर.पी.बंधनकारक आहे. तसेच परिच्छेद २६ नुसार औषधे एमआरपी पेक्षा जास्त दराने विकण्यास प्रतिबंध आहे.

(२) हे खरे नाही.

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने इंडियन मेडीकल कौन्सिल (प्रोफेशनल कॉन्डक्ट, एटीकेट ॲण्ड एथिक्स) रेग्युलेशन्स, २००२ बनविले आहे. या विनिमयातील विनियम १.५ अनुसार प्रत्येक भिषकाने शक्यतोवर सामान्य (जेनेरिक) नावाने औषध पत्र (प्रिस्क्रिप्शन) द्यायला पाहिजे परंतु तशी सक्ती नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील १९४२ गावांत पाण्याची टंचाई निर्माण झाल्याबाबत

(३२) * ८२४३ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील १९४२ गावांत तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर गावांची पाणीटंचाई निवारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.

पूर्व विदर्भातील नागपूर व वर्धा जिल्ह्यातील अनुक्रमे १६०४ व ३३८ अशा एकूण १९४२ गावात पाणी टंचाई निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

नागपूर विभागातील भंडारा १४९ गावे, गोंदिया ३५ गावे, चंद्रपूर ८९१ गावे, गोंदिया ३५ गावे, चंद्रपुर ८९१ गावे व गडचिरोली १३ गावे एवढया गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) नागपूर विभागातील पिण्याचे पाणी टंचाई निवारण कार्यक्रम (२०१४-१५) अंतर्गत सविस्तर टंचाई निवारण उपाययोजनांचे कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत. नागपूर, वर्धा, भंडारा,चंद्रपूर,गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांना मिळून मूळ टंचाई कृती उपाययोजनांसाठी एकूण १९४५ गावे व ११ वाड्यात २७२८ उपाययोजनांचे रुपये २२६७.८२ लक्ष किंमतीचे आराखडे तयार करण्यात आले आहेत.

याशिवाय नागपूर, वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांना मिळून पुरवणी टंचाई कृती उपाययोजनांसाठी एकूण १०७४ गावांत २२६४ उपाययोजनांचा पुरवणी आराखडा तयार करण्यात आला असून त्यासाठी संभाव्य निधी रुपये १८९४.४२ असा आहे.मूळ व पुरवणी संभाव्य टंचाई उपाययोजनांसाठी एकूण ३०१९ गावे व ११ वाड्यांत ४९९२ उपाययोजनांचा रुपये ४१६४.२४ लक्ष किंमतीचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

(३) या वर्षी पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत दिनांक २७.०६.२०१५ पावेतो नागपूर जिल्ह्यातील नागपूर (ग्रामीण), हिंगणा, कामठी व काटोल तालुक्यातील १८ गावांना २३ टँकरद्वारे, वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील १ गावास १ टँकरद्वारे व चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील २ गावांना १ टँकरद्वारे असा एकूण २१ गावांना २५ टँकर्सने पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

दिनांक २७.०६.२०१५ अखेर नागपूर-१५१,वर्धा-४३, गोंदिया-०३ व चंद्रपूर-०३ अशा २०० खाजगी विहीरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. आतापावेतो विभागात एकूण ५४४ गावे/वाड्यात ८७९ नवीन हातपंपाची कामे, ६२९ गावात १०९२ विंधन विहीरींची विशेष दुरुस्तीची कामे, १०२ गावात १६५ खोलीकरणाची कामे व ८४ गावात ८४ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्तीची अशी एकूण १३९६ गावे/वाड्यात २२६४ उपाययोजनांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

तसेच, सद्य:स्थितीत ४७८ गावे/वाड्यात ६८३ नवीन विंधण विहीरी, १२ गावांत १२ विहीर खोलीकरणाची कामे, ७ गावात ७ तात्पुरत्या नळ योजनांची कामे, १४४ गावात १४४ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्तीची कामे, ४० गावात ८१ विंधन विहीरींची विशेष दुरुस्तीची कामे अशी एकूण ८४७ गावे/वाड्यात ११०८ उपाययोजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पेण (जि.रायगड) तालुक्यात निर्माण झालेली पाणी टंचाई

(३३) * ७७१५ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यात शहापाडा, हेटवणे, आंबेघर ही धरणे असूनही तालुक्यातील ३९ गावे व ९१ वाडयांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त वाडया व गावे यांना कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्याचे दृष्टीने शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शहापाडा धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्याने गावे/वाड्यांना कायमस्वरुपी पाणीपुरवठा उपाययोजनांची सोय करण्यासाठी ग्रामस्थांच्या मागणीनुसार हेटवणे धरणातून शहापाडा धरणामध्ये पाणीपुरवठा करण्याच्या कामाचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार पेण तालुक्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

सन २०१४-२०१५ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्यातील ३० गावे व ५६ वाड्यांना १२ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात फ्लोराईड युक्त पाणीपुरवठा होत असल्याबाबत

(३४) * ६९५८ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील १ हजार ८३६ गावात फ्लोराईडयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नागरिकांना स्वच्छ व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही, तथापि, जिल्हा परिषदेमार्फत दिनांक १५ सप्टेंबर, २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीमध्ये रासायनिक तपासणी अभियान राबविण्यात आलेले आहे.

(३) फ्लोराईडयुक्त स्त्रोत असलेल्या एकूण ३७२ गावांपैकी ३०३ गावात शुध्द पाणीपुरवठा होत आहे. उर्वरित ६९ गावांपैकी, ४९ गावे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ च्या कृती आराखडयात समाविष्ट करण्यात आली असून २० गावे जलस्वराज्यच्या आराखडयात समाविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे, पालघर जिल्ह्यातील भूजल पातळी खालावत असल्याबाबत

(३५) * ७१६५ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, पालघर जिल्ह्यातील भूजल पातळी खालावत असल्याचे जिल्हा परिषदेच्या भूजल सर्वेक्षण विभागाने अहवालात नमूद केले असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती भूजल पाण्याच्या पातळीत वाढ होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणती कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत केलेल्या भूजल पातळीच्या अभ्यासाअंती ठाणे जिल्ह्यातील ५ तालुक्यात वाढ (० ते १ मीटर) व २ तालुक्यात नगण्य घट (०.०४ मीटर) तसेच पालघर जिल्ह्यातील ८ तालुक्यांपैकी ४ तालुक्यांमध्ये भूजल पातळीच्या सरासरी तुलनेत वाढ (० ते १ मीटर) व ४ तालुक्यात नगण्य घट (० ते ०.१४ मीटर) आढळून आलेली आहे.

(३) भूजल पातळीमध्ये वाढ होण्याकरीता शासनामार्फत खालील कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

अ) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम-पिण्याच्या पाण्याचे उद्भव बळकट करण्याकरीता तसेच पिण्याच्या पाण्याची विहीरीची पातळी वाढविण्यास भूजल पुर्नभरणचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

ब) पाणलोट विकास कार्यक्रम- सदर कार्यक्रम मृद संधारण खाते व वसुंधरा/एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन प्रकल्प यांचेमार्फत राबविण्यात येतात.

क) जलयुक्त शिवार अभियान - सदर कार्यक्रमा अंतर्गत भूजल पातळीत वाढ करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आयटीआय द्वारे फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतलेल्या ऑल इंडिया ट्रेड टेस्टमधील प्रश्नपत्रिकेत असंख्य चुका असल्याबाबत

(३६) * ७१२२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयटीआय द्वारे फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतलेल्या ऑल इंडिया ट्रेड टेस्टमधील प्रश्नपत्रिकेत असंख्य चुका असून या प्रश्नांची व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महासंचालकांनी पुरवलेली उत्तरेही चुकीची असुन त्या लक्षात आणून देऊनही दुरुस्त करण्यात आल्या नसल्याचा आरोप असोसिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट आयटीआय संघटनेने केला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव हजारो विद्यार्थी नापास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांनी पुरविलेल्या प्रश्नपत्रिका व उत्तरामध्ये, Answer Key मधील त्रुटींबाबत चुका असल्याचे आैद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी निदर्शनास आणून दिल्यावर त्यावर कार्यवाही करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत डी.जी.ई. टी., नवी दिल्ली यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अनुदानानित माध्यमिक शाळांचे इ-५ वी व इ-७ वी वर्ग प्राथमिक शाळांना जोडण्याचा निर्णयाबाबत

(३७) * ८२०० श्री.दत्तात्रय सावंत : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ६ एप्रिल २०१५ च्या सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये अनुदानित माध्यमिक शाळांचे इ-५ वी व इ-७ वी चे वर्ग प्राथमिक शाळांना जोडण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनाअनुदानित शाळा व त्या शाळेत काम करणाऱ्या मान्यताप्राप्त शिक्षकांच्या सेवा नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे आणि त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणेबाबत प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून आरटीई मधील तरतूदी विचारात घेऊन उचित निर्णय घेण्यात येईल.

औरगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विभाजन करुन उस्मानाबादला स्वतंत्र विद्यापीठ करणेबाबत

(३८) * ७४५८ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विभाजन करुन उस्मानाबादला स्वतंत्र विद्यापीठ करणेसाठी व्यवस्थापन परिषद आणि अधिसभेने ठराव मंजूर करुन शासनाकडे पाठवला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणत्या प्रकारची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) विद्यापीठाचे विभाजन करण्यासाठी डॉ. राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अहवाल विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालण्याबाबत

(३९) * ७६५५ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०४ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर शासनाने बंदी घालूनही पिशव्यांचे उत्पादन सुरु असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा सर्रासपणे वापर होत असुन मुलूंड (मुंबई) येथे अनुशासन विभागाने पिशव्या विक्रेत्यांवर टाकलेल्या छाप्यात ५३२ किलो वजनाच्या ५० मायक्रॉनपेक्षा पातळ पिशव्यांचा साठा जप्त केला असल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने आतापर्यंत अनधिकृतपणे उत्पादन करणाऱ्या कंपन्या तसेच किती विक्रेत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्यापी, कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे आहे.

(२) दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी मुलुंड (मुंबई) येथे ५० मायक्रॉनपेक्षा पातळ पिशव्यांचा एकूण ५२३.५०० कि.ग्रॅ.इतका साठा जप्त करण्यात आल्याचे मुंबई महानगरपालिकेच्या अहवालात नमुद करण्यात आले आहे.

(३) व (४) उपरोक्त बाबत प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणा-या संबंधित विक्रेत्याविरुद्ध एफ.आय.आर.दाखल करण्यात आला असून आतापर्यंत प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचा वापर केल्याप्रकरणी जानेवारी, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत रुपये ३६,५०,०००/- इतक्या रकमेचा आर्थिक दंड वसूल केला असल्याचे मुंबई महानगरपालिकेने त्यांचे अहवालात नमुद केले.

प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन व वापराविरुद्ध कठोर कारवाई करण्याकरीता मा.मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये संपन्न झालेल्या आढावा बैठकीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या क्षेत्रिय स्तरावरील सर्व प्रादेशिक अधिकाऱ्यांना, संबंधित शासकिय यंत्रणेचे क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी (उदा.महानगरपालिका, महसूल विभाग, पोलीस विभाग) घेऊन तपासणी पथके तयार करुन सर्वेक्षण करणेबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राज्यामध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये सद्यःस्थितीत एकूण २७१ कारखान्यांची तपासणी करण्यात आली आहे. सदर तपासणीअंती ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन करत असल्याचे आढळलेल्या एकूण ३० उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून पर्यावरण कायदा १९८६ (कलम १५ अंतर्गत) एकूण ०४ उद्योगांवर न्यायालयामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच वैध संमतीपत्राशिवाय उत्पादन करत असलेल्या एकूण ५६ उद्योगांवर प्रस्तावित निर्देश/कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कारवाई करण्यात आली आहे. उत्पादन बंदचे आदेश देण्यात आलेल्या ३० उद्योगांपैकी ८ कारखान्यांना बँक हमी घेऊन उत्पादन सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आहे. विक्रेत्यांकडून प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या विक्रेत्यांचे सर्वेक्षण करण्याकरीता महानगरपालिकांकडून फिरते पथक गठीत करण्यात आले असून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत सर्व महानगरपालिकांकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईत सर्व शिक्षा अभियानाची पुस्तके रद्दीच्या दुकानात आढळल्याबाबत

(४०) * ७०९१ श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेली मोफत पुस्तके नवी मुंबईतील एका रद्दीच्या दुकानात माहे मे २०१५ मध्ये आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या शाळांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शाळांमध्ये लघु विज्ञान केंद्र उभारण्याचा निर्णयाबाबत

(४१) * ६८४२ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये लघु विज्ञान केंद्र उभारण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय,

(२) व (३) संदर्भातील तांत्रिक बाबींची पुर्तता करण्याची कार्यवाही चालु असून ती पूर्ण होताच सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल.

धामणगाव, चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथे राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थी वंचित असल्याबाबत

(४२) * ८९१६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव, चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथे राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत प्रलंबित (सन २०१२ पासून) ६० प्रकरणे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये अर्थसहाय्य अभावी प्रलंबित असल्याने याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त योजनेअंतर्गत प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) दिनांक १.६.२०१५ रोजीचे निवेदन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद अमरावती यांना उद्देशुन दिले आहे.

सन २०१२ ते २०१५ या कालावधीत अमरावती जिल्ह्यातील ६० लाभार्थीना सदर योजनेतंर्गत निधी वितरित करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राजगुरुनगर (जि.पुणे) परिसरात होणारी अनधिकृत बाटलीबंद पाण्याची निर्मिती उद्योग सुरु असल्याबाबत

(४३) * ९०४५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (जि.पुणे) परिसरातील बाटलीबंद पाण्याची निर्मिती करणारे छोटे-मोठे उद्योग सुरु असून अधिकृत परवानगी न घेता लाखो रुपयांची उलाढाल होत असून या अनधिकृत ५ ते ६ कंपन्यांवर अन्न व औषध भेसळ प्रशासनाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदरील अनधिकृत बाटली बंद पाण्याची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे अंशत खरे आहे.

राजगुरुनगर (जि.पुणे) परिसरातील बाटलीबंद पाण्याची निर्मिती करणारे ०३ अनधिकृत विना परवाना व बी.आय.एस. परवानगी नसलेले उद्योग माहे मार्च व एप्रिल, २०१५ मध्ये टाकलेल्या छाप्यामध्ये निदर्शनास आले होते.
(२) होय.
(३) सदर ०३ अनधिकृत आस्थापनांना कलम ३६ (३) (ब) नुसार प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आले आहेत. तपासणीसाठी घेतलेले ०२ पाण्याचे नमूने असुरक्षित आढळून आल्याने संबंधित २६ पाण्याचे सिलबंद जार किंमत रु. २६०/-, ७५ रिकामे जार, १९९ लेबल्स व ५१० जारच्या झाकणांचा साठा जप्त करण्यात आला असून असुरक्षित नमून्या प्रकरणी तपास व चौकशी सुरु असून, अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शिक्षण हक्क कायदा २०१० नुसार इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण सक्तीचे व मोफत करुन शिक्षणाची हमी बंधनकारक करण्याबाबत

(४४) * ९१३८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षण हक्क कायदा २०१० नुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना इयत्ता पहिली ते इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण सक्तीचे व मोफत करुन शिक्षणाची हमी बंधनकारक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेली पाच वर्षे उलटून गेल्यानंतरही मुंबई महापालिकेच्या ११०० शाळांमध्ये ८ वी पर्यंतचे वर्ग सुरु करणे शक्य झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पहाणी केली आहे काय व त्या पाहणीचे निकष काय आहेत,

(४) राज्यात सर्व शिक्षा अभियान व शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासन काेणती कार्यवाही व उपाययोजना करणार आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे, तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३१० प्राथमिक शाळांमध्ये इ.आठवी चे वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उर्वरित प्राथमिक शाळांमध्ये वर्ग खोल्यांची उपलब्धता, विद्यार्थी पटसंख्या RTE कायद्यांतील निकष इत्यादी बाबी तपासून इ.आठवीचे वर्ग सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) राज्यात सर्व इ.४ थी पर्यंतच्या शाळांमध्ये इ.५ वी आणि सर्व इ.७ वी वर्गापर्यंतच्या शाळांमध्ये इ.८ वी चा वर्ग अतिरिक्त वर्ग खोली आणि अतिरिक्त शिक्षक पदाची आवश्यकता तपासून टप्प्याटप्प्याने जोडण्याची बाब विचाराधीन आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयामधील अध्यापक पदाच्या भरतीमध्ये मागासवर्गीयांचे आरक्षण डावलल्याबाबत

(४५) * ९५४९ ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयामधील अध्यापक पदाची भरती करताना संबंधित संस्थाचालक शासनाच्या परिपत्रकाच्या चुकीचा अर्थ लावून मागासवर्गीयांचे आरक्षण डावलत असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विदयालयामध्ये बिंदू नामावली डावलण्यासाठीच शासकीय परिपत्रकाचा चुकीचा अर्ज लावण्यास येत असून मागासवर्गीयांना पदांपासून वंचित ठेवले जात असल्याची तक्रार डॉ.आशय नांदेश्वर, वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, नांदेड यांनी अनुसूचित जाती आयोगाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) अनुसूचित जाती आयोगाकडून अशी कोणतीही तक्रार शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नगरपालिकामधील उच्चमाध्यमिक, शिक्षकांना १९९६ पासूनच्या सुधारित वेतनश्रेणीचा लाभ मिळण्याबाबत

(४६) * ९८१५ श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक ५४९० ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदामधील उच्चमाध्यमिक शिक्षकांना १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणीचा (काल्पनिक) लाभ देण्यात यावा अशी मागणी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास अमरावती विभाग शिक्षक आघाडीने निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास नगरपरिषदामधील उच्च माध्यमिक शिक्षकांना १९९६ पासूनची सुधारित वेतनश्रेणी (काल्पनिक) मिळावी अशी वारंवार मागणी होवूनसुध्दा शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषदामधील कार्यरत उच्च माध्यमिक शिक्षकास सुधारित वेतन श्रेणी देण्याविषयी शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शासनाच्या दिनांक २६.२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शिक्षकांना दिनांक १.१.१९९६ पासून त्रिस्तरीय वेतनश्रेणीचे लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत.

शालेय आठवडा पाच दिवसांचा करण्याच्या निर्णयाबाबत

(४७) * ९८२१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने पाच दिवसांचा शालेय आठवडा करण्याचा व त्यानुसार शैक्षणिक पध्दतीत बदल करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच दिवसांचा शालेय आठवडा करण्याचा शासन निर्णयाबाबत राज्यातील नागरिकांकडून प्रतिक्रिया शासनाकडे निवेदनाद्वारे पाठविण्यात आल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाची निश्चित काय भूमिका आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही. तथापि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये शिक्षकांचे कामाचे किमान दिवस व शिक्षणाचे तास इत्यादी बाबी शासन निर्णय दिनांक २९ एप्रिल, २०११ अन्वये विहित करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) क्षेत्रिय अधिका-यांकडून आठवड्यातील सहा दिवस शाळा सुरू ठेवावी अशी सक्ती करण्यात येत असल्याबाबतच्या तक्रारी लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त झाल्या होत्या. यास्तव शासन निर्णय दिनांक २९ एप्रिल, २०११ अन्वये योग्य ती कार्यवाही करण्याचे निदेश क्षेत्रीय अधिका-यांना देण्यात आले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबाबत

(४८) * १००१६ श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात सतत तीस दिवस गैरहजर राहणाऱ्या पहिली ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शोध घेतला असता ४ हजार ८८२ मुले शाळाबाहय असल्याचे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.
(२) जिल्हयातील ४८८२ विद्यार्थ्यांपैकी ३९०१ विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आले आहे. उर्वरीत ९८१ विद्यार्थ्यांना वयानुरुप प्रवेश देऊन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील सांडपाण्यामुळे गुरे आजारी पडल्याबाबत

(४९) * १०१३२ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील डबक्यामध्ये साचलेले प्रदूषित सांडपाणी गुरांनी प्यायल्याने ती आजारी पडली तर करंबवणे खाडीमध्ये मासे मृत झाल्याच्या घटना घडल्या असल्याचे दिनांक २ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) करंबवणे खाडीत दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ व १५ सप्टेंबर, २०१४ रोजी मासे मर्तुकीच्या घटनास्थळावरील घेतलेल्या मृत माश्यांच्या नमुन्यांच्या पृथ:क्करण अहवालानुसार मासे मर्तुकी विषारी द्रव्याने झाली नसल्याचे निष्पन्न झाल्याने उद्योगांवर कारवाई करण्यचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी-हिंगोली जिल्ह्यातील निर्मल भारत अभियानाचा अपयशाबाबत

(५०) * १०२११ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निर्मल भारत अभियान अंतर्गत ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेल्या शौचालय बांधकामासाठी अधिकारी व प्रशासकीय यंत्रणा उदासिन असल्यामुळे परभणी व हिंगोली जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१५ अखेर बहुतांशी कामे केवळ कागदोपत्री व अस्तित्वातच नसल्याबाबतचा आक्षेप सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.प्रधान सचिव, (स्वच्छता विभाग), मुंबई यांच्याकडे सन २०१५ दरम्यान नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ कागदोपत्री योजनेची प्रसिध्दी करुन प्रत्यक्षात उद्दिष्ट पुर्तीसाठी उदासिन असणाऱ्या व प्रत्यक्ष काम न करता बोगस कागदपत्राद्वारे पूर्ण झाल्याचे दाखविणाऱ्या अधिकारी/कर्मचारी व यंत्रणाची चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या कामी दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकारी, कर्मचारी व यंत्रणाविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आल आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही. याबाबत लेखी तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात माहे जानेवारी, २०१५ अखेर परभणी जिल्ह्यातील १५,५५४ वैयक्तिक शौचालय बांधकामाच्या उद्दिष्टांपैकी, प्रत्यक्षात ११,४३४ शौचालये तर हिंगोली जिल्ह्यातील १६,५८८ वैयक्तिक शौचालय बांधकामाच्या उद्दिष्टांपैकी ३,९१९ इतकी शौचालये बांधण्यात आली आहेत.

(२), (३) व (४)

हिंगोली जिल्ह्यातील वैयक्तिक शौचालय बांधकामाच्या सन २०१४-१५ च्या उद्दिष्टांपैकी केवळ २४% उद्दिष्टपूर्ती करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन उचित कार्यवाही करण्याचे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना देण्यात आले आहेत.

मुंबई आणि ठाण्यातील काही औषध दुकानाची पाहणी केली असता ग्राहकांना बिल न देणाऱ्या अंदाजे २५ दुकानदारांना एफडीएने नोटीस बजावल्या असल्याबाबत

(५१) * १०४२० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.राजेंद्र मुळक, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राहकांना औषध खरेदी केल्यानंतर बिल देत नसलेल्या औषध दुकानदारांविरुध्द अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उभारला असून यामुळे काही दिवसापूर्वी मुंबई आणि ठाण्यातील काही औषध दुकानाची पाहणी केली असता ग्राहकांना बिल न देणाऱ्या अंदाजे २५ दुकानदारांना एफडीएने नोटीस बजावल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषधे प्रशासनाच्या नियमावलीनुसार औषधाची खरेदी केल्यावर औषधाची बिले देणे हा ग्राहकांचा अधिकार आहे परंतू काही ठिकाणी औषध दुकानदार बिल देत नसून टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्राहकांचे हितास धोका निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व तदनुषंगाने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) नियमित तपासण्यांच्या वेळी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतूदीनुसार कायद्याने उल्लघन करताना आढळून आलेल्या दुकानदाराविरुध्द नियमानुसार कारवाई केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

औषधांची बिले देणे हे कायद्यानुसार बंधनकारक असून, बिले न देणाऱ्या औषध विक्रेत्यांविरुध्द अन्न व औषध प्रशासनामार्फत कारवाई करण्यात येते

(४) ठाणे विभागामार्फत माहे एप्रिल, २०१५ या कालावधीत औषध विक्री बिल न दिल्यामुळे ५२ प्रकरणी औषध दुकानदारांविरुध्द कारवाई करण्यात आली असून ५० पेढयांचे परवाने निलंबित केले असून ०२ प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे.

बृहन्मुंबई विभागाद्वारे माहे एप्रिल वा त्या दरम्यान केलेल्या तपासणी परवाना प्राधिकारी यांनी एकूण २२ औषध दुकानदारांना औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदींच्या उल्लंघनासाठी कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असून ८ पेढयांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

एम.एस.सी.नर्सिंग अभ्यासक्रमाकडील प्रशिक्षणासाठी प्राध्यापकांची पदे भरण्याबाबत

(५२) * **७२९९ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूर व इतर ठिकाणी शासकीय महाविद्यालयामध्ये एम.एस.सी नर्सिंग अभ्यासक्रम शासनाने सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सेवाज्येष्ठतेनुसार उपलब्ध शिक्षकांमधून पदोन्नतीने व काही पदे सरळसेवा भर्तीने भरण्यासंबंधी नागपूर विभागाच्या लोकप्रिनिधींनी निवेदनाद्वारे विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अभ्यासक्रमाच्या नर्सिंग महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी आवश्यक गुणवत्ताधारक प्राध्यापकांची पदे अद्यापपर्यंत भरण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४), (५) व (६) याबाबत नमूद करण्यात येते की, राज्यात नव्याने सुरु केलेल्या ५ परिचर्या महाविद्यालयाकरीता नव्याने निर्माण केलेली पाठयनिर्देशक वगळता उर्वरित सर्व पदे लोकसेवा आयोगाच्या कार्यक्षेत्रातून वगळून ज्या पाठ्यनिर्देशंकानी एम.एस्सी.

(नर्सिंग) ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केली आहे अशा जेष्ठतम् पाठ्यनिर्देशकांना शिकविण्याच्या अनुभवाची अट शिथिल करुन पाठ्यनिर्देशकांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे.

अर्धवेळ काम करणाऱ्या आणि तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनाबाबत

(५३) * ७५८८ डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाकडून संच मान्यतेची प्रक्रिया सुरु झालेली नाही त्यामुळे अर्धवेळ काम करणाऱ्या आणि तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांना वर्षभरापासून वेतन मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या शिक्षकांना शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी वेतन मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) ऑनलाईन संचमान्यतेची कार्यवाही पूर्ण होताच वेतन अदा करण्यात येईल.

राज्यात जीवरक्षक औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

(५४) * ६७८७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील - हृदयरुग्ण, कर्करोगग्रस्त, मधुमेही, यकृत वा मुत्रपिंड प्रत्यारोपन करणाऱ्या रुग्णांना जीवरक्षक औषधांचा तुटवडा जाणवत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित औषधांच्या निर्मात्यांनी देशांतर्गत बाजारपेठेत उपलब्ध करण्यात आलेल्या साठयाची माहिती शासनास देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने बाजारपेठेतील पुरवठयात खंड पडल्यास कारवाईचा इशाराही औषध निर्मात्यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने औषधांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या औषध निर्मात्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

औषध किमंत नियंत्रण आदेश २०१३ अंतर्गत परिच्छेद २१ नुसार औषध निर्मात्यांनी शेडयुल औषधांबाबत देशांतर्गत बाजारपेठेत उपलब्ध केलेल्या साठयाची माहिती शेडयुल २ मधील नमुना ३ मध्ये भरुन ते केंद्र शासनास देणे बंधकारक आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अन्न व औषध प्रशासनामार्फत औषध विक्रेत्यांकडे चौकशी केली असता, सदर औषधाचा साठा पुरेसा उपलब्ध असल्याचे आढळले आहे.

(५) उपरोक्त वस्तुस्थिती पाहता कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

इंडियन एज्यूकेशन सोसायटीच्या कात्रप विद्यालय, कुळगांव-बदलापूर येथील शिक्षकांचे वेतन जाणीवपूर्वक बंद केल्याबाबत

(५५) * **८०६० श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंडियन एज्यूकेशन सोसायटीच्या कात्रप विद्यालय, कुळगांव-बदलापूर या प्राथमिक शाळेस १०० टक्के अनुदानावर किती वर्गांना मान्यता दिलेली आहे,

(२) मान्यता प्राप्त अनुदानित वर्गांसाठी तत्कालीन शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांनी सहायक शिक्षकांच्या किती पदांना मान्यता दिली आहे,

(३) शैक्षणिक वर्षे २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये किती सहाय्यक शिक्षकांना वेतन दिले असून, वेतन बंद केलेल्या शिक्षकांची संख्या किती आहे,

(४) वर्षानुवर्षे वेतन घेणाऱ्या शिक्षकांचे वेतन बंद करण्याची कारणे काय आहेत,
(५) मा.मंत्री महोदयांनी निर्देश देऊनही संबंधित शिक्षकांचे वेतन रोखून धरणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) इंडियन एज्युकेशन सोसायटी संचलित कात्रप विद्यालय, कुळगांव बदलापूर या प्राथमिक शाळेच्या सहा वर्गाना मान्यता दिलेली आहे.
(२) शासन निर्णय दिनांक २९ मार्च, २००१ अन्वये ४ पदांना शासन मान्यता आहे. तथापि, शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी सदर शाळेतील ६ शिक्षकांच्या पदांना मान्यता दिलेली आहे.
(३) शैक्षणिक वर्षे २०११-१२, २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मध्ये ६ शिक्षकांना वेतन देण्यात आले आहे. या काळावधीत कोणत्याही सहायक शिक्षकाचे वेतन बंद करण्यात आलेले नाही.
(४) व (५) शासन निर्णय दिनांक २९ मार्च, २००१ नुसार ४ पदे मंजूर आहेत. तथापि, वेतन अदा केलेल्या एकूण ६ पदांपैकी २ पदांना शासन मान्यता नसल्यामुळे त्यांचे वेतन माहे सप्टेंबर, २०१४ पासून बंद करण्यात आलेले आहे.

शासकिय आयुर्वेदीक रुग्णालय, नागपूर येथील बंद असलेले एक्स-रे मशिन सुरु करण्याबाबत

(५६) * ७३४४ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय, नागपूर येथील एक्स-रे मशिन गेल्या सात महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात औषधांचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांची १६ कोटींची बिले थकल्यामुळे त्यांनी पुरवठा बंद केला व परिणामी रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झाला, हे खरे आहे काय,
असल्यास, यासंदर्भात अधिष्ठाता, रुग्णालय ह्यांना प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औषधांअभावी गरीब रुग्णांना बाहेरुन औषधे आणावी लागत आहेत तसेच अधिष्ठाता, रुग्णालय यांच्याकडे प्रस्ताव पाठविले असता निधी मंजूर होऊनही कामे होत नसल्याचे सांगितले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुषंगाने गरीब रुग्णांना औषधे वेळेवर मिळण्याबाबत व एक्स-रे मशिन सुरु करण्याबाबत तसेच दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) सुटया भागांअभावी शासकीय आयुर्वेद रुग्णालय नागपूर येथील क्ष-किरण यंत्र नादुरुस्त होते हे खरे आहे. सदर मशिन सुरु करण्याच्या अनुषंगाने अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर यांच्या स्वीय प्रपंची खात्यातून सुटे भाग खरेदी करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

(२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस औषधे पुरवठा करणाऱ्या काही कंत्राटदारांनी देयके थकित असल्याच्या कारणास्तव औषधांच्या पुरवठा अशंत: बंद केला होता हे खरे आहे.

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी त्यांच्या वित्तीय अधिकारांतर्गत असलेल्या देयकांचे प्रदान केले असल्यामुळे औषधांचा पुरवठा होत असून रुग्णांना वेळेवर औषधे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. थकित देयकांचे प्रदान करण्यासाठी मार्च २०१५ च्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीचा प्रस्ताव शासना सादर न केल्याबाबत संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. औषधी व सर्जिकल बाबींकरिता पुरवणी मागण्यांबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) वरील (१), (२) व (३) प्रमाणे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील खाजगी कोचिंग क्लासेस करीता मान्यतेचे निकष, नियम निश्चित करणे व क्लासेसच्या शिक्षकांसाठी शैक्षणिक अर्हता ठरविणेबाबत.

(५७) * **९८५९ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक शहरात मोठया संख्येने सुरु असलेल्या खाजगी कोचिंग क्लासेसकरिता मान्यतेचे कोणतेही निकष, नियम निश्चित करण्यात आलेले नाहीत, तसेच या क्लासेस मधून शिकविणाऱ्या शिक्षकांसाठीच्या शैक्षणिक अर्हतेचे कोणतेही निकष नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक कोचिंग क्लासेस गैरसोयीचे ठिकाणी, अपुऱ्या शैक्षणिक व भौतिक सुविधांसह आणि अपात्र शिक्षकांकरवी चालविले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वच इयत्तांसाठी खाजगी क्लासेस सुरु करण्याकरिता शासन मान्यतेचे विहीत निकष निश्चित करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी कोचिंग क्लासेसकरिता शासनाचे मान्यता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करणे व त्यासाठी विहीत निकष, नियम निश्चित करणेसंदर्भात आणि खाजगी क्लासेस मधून शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी शिक्षणाची अट निर्धारित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) खाजगी कोचिंग क्लासेस संदर्भात नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये मा. अशोक प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभाग व उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या संचालक स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी भागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत

(५८) * ७०२८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी भागातील भोसेसह ३९ गावांसाठी कार्यान्वित झालेल्या भोस प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम धिम्या गतीने सुरु असल्याने नागरीकांची पाणीटंचाईच्या कारणास्तव पाच ते सहा महिने गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांसाठी टॅकरने पाणीपुरवठा केला जात असूनही पाण्याचा प्रश्न सुटला नाही तसेच टँकरच्या अपुऱ्या खेपा, असुविधा, लांब पल्ला, गळके टँकर यामुळे लोकांची गैरसोय होऊन अपुरे पाणी मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भोस प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सन २०१५ पर्यंत पूर्ण करुन उक्त गावांसाठी पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) भोसे व ३९ गांवे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेस दि. २८ ऑगस्ट, २०१४ रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत. सदर योजनेस काम पूर्ण करण्याची मुदत दि. २७ ऑगस्ट, २०१७ पर्यत आहे. सद्यस्थितीत योजनेचे ४०% काम पुर्ण झालेले आहे. उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आर.टी.ई.२००९ नुसार विद्यार्थ्यांना अपंग समावेशित पूर्णवेळ नियमित शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत

(५९) * **७६६९ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर.टी.ई.२००१ नुसार विशेष गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांना अपंग समावेशित पूर्णवेळ नियमित विशेष शिक्षकांची नेमणूक अद्यापी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) सदर शिक्षकांना नियमित नेमणूका आणि वेतन देण्याच्या मागणीबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र पुरस्कृत सर्व शिक्षा अभियानासाठी सर्व पदे ही कंत्राटी पध्दतीने ६-६ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरुपातील भरण्यात आली आहेत. सर्व सामावेशित शिक्षण उपक्रमासाठी विशेष शिक्षकांची १९४८ पदे करार पध्दतीने ६-६ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आली आहेत.

(२) व (३) सर्व शिक्षा अभियान ही योजना केंद्र पुरस्कृत योजना असुन सदर योजनेंतर्गत विशेष शिक्षक ही पदे कंत्राटी पध्दतीने ६-६ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर भरण्यात आली आहेत. त्यामुळे विशेष शिक्षकांना नियमित नेमणूका आणि वेतन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अभियांत्रिकी महाविद्यालयातील भ्रष्टाचार तसेच विद्यार्थ्यांची लुटमार रोखण्याबाबत

(६०) * ९९८६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभियांत्रिकी महाविद्यालयातील भ्रष्टाचार तसेच विद्यार्थ्यांची लुटमार रोखण्यासाठी शिक्षण सम्राट व उच्च तंत्र शिक्षण संचालक, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे अधिकारी व उच्च व तंत्र शिक्षण सचिवांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी सिटीझन फोरमच्यावतीने लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे नुकतीच केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिटीझन फोरमच्या पाठपुराव्यामुळे नवी मुंबई, मुंबई व ठाण्यातील २९ अभियंत्रिकी महाविद्यालयांच्या झालेल्या चौकशीत अनेक महाविद्यालयांत निकषांची पूर्तता नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा अहवाल उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिवांकडे शुल्क समितीपुढे न ठेवता धूळखात पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अहवालांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती ठोस उपाययोजना केलेली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून सिटीझन फोरमने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने २९ संस्थापैकी एका संस्थेचे नाव २ वेगवेगळया नावाने निर्देशित केले आहे. त्यामुळे एकूण २८ संस्थापैकी २१ संस्था तंत्र शिक्षण संचालनालयाशी संबंधित असून त्यापैकी १६ संस्था अभियांत्रिकी व पदव्युत्तर, ४ संस्था तंत्रनिकेतने १ संस्था (विद्यापीठ स्थापीत) आहे. १६ अभियांत्रिकी व पदव्युत्तर संस्थांची तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून त्यापैकी १५ अभियांत्रिकी महाविद्यालयांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषांची पूर्तता केली नसल्याचे आढळून आले आहे. १ संस्थेने निकषाची पूर्तत केली आहे.

(३) नाही.

(४) ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषांची पूर्तता पूर्ण केली नाही, अशा संस्थांच्या त्रुटींबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने सदर संस्थांना “No admission category” या मध्ये टाकले होते. सदर निर्णयाविरुध्द

संस्थाचालकांनी /महाविद्यालयांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या आदेशावर स्थगिती मिळविली व या संस्थांचा प्रवेश प्रक्रियेत (CAP) समावेश करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले. त्यामुळे या संस्थांना प्रवेश प्रक्रियेत सामावून घेणे क्रमप्राप्त झाले. सदर याचिकांवर अंतिम सुनावणी प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे आणि नागपूर येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय

(६१) * ८४९९ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, ॲड.अनिल परब, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट दर्जाचे मनुष्यबळ निर्माण व्हावे यासाठी पुण्यात चाकण येथे तर नागपुरात वारंगा येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (इंडियन इंन्स्टीट्युट ऑफ इन्फॉमॅशन टेक्नॉलॉजी) स्थापना करण्याचा निर्णय माहे मे, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप व उद्दीष्ट काय आहेत,

(३) असल्यास, यासाठी एकूण किती खर्च येणे अपेक्षित आहे व सदरचा निधी कशाप्रकारे व किती कालावधीत उपलब्ध करण्यात येणार आहे,

(४) तसेच सदर संस्था निश्चित केव्हापासून कार्यान्वित करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, सदर संस्थेसाठी भूसंपादन, इमारती, कार्यालय, इत्यादिसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) दिनांक २० मे, २०१५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

(२) भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था स्थापन करणेबाबत घेण्यात आलेल्या निर्णयात प्रकल्पाकरिता जमीन, निधीची उपलब्धता व प्रकल्पाच्या अनुषंगिक बाबींचा समावेश आहे.

राज्यात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट दर्जाचे मनुष्यबळ तयार करणे आणि विविध क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वाराकरीता शिक्षणाचे मॉडेल तयार करणे हे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (IIIT) संस्था स्थापण्या मागील महत्वाचे उद्दिष्ट आहे.

(३) प्रस्तुत प्रकल्पाकरीता मांडवली खर्च (अनावर्ती खर्च) रु. १२८ कोटी व आवर्ती खर्च रु. १२.५० कोटी (आवर्ती खर्चाकरिता केंद्र शासनाचे रु. १०/- कोटी व Faculty Development करीता केंद्र शासनाचे प्रत्येक IIIT करीता रु. २.५ कोटीचे अनुदान) असा एकुण रु. १४०.५० कोटीचा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च केंद्र शासन ५० टक्के , राज्य शासन ३५ टक्के व खाजगी उद्योजक भागीदार १५ टक्के या प्रमाणात एकूण ७ वर्षाच्या कालावधीत निधी उपलब्ध करावयाचा आहे.

(४) प्रस्तुतची संस्था शैक्षणिक वर्ष सन १०१६-१७ पासून कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

(५) या प्रकरणी महसुल व वन विभागाकडून जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा शहर आणि तालुक्यातील पाणी टंचाई दूर करणेबाबत

(६२) * ७८५५ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा तालुक्यात आणि शहरात (जि.यवतमाळ) पाणीपट्टीसाठी कोटयवधी रुपये खर्च केले असून दारव्हा शहर आणि तालुक्यात सद्य:स्थितीत तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दारव्हा शहर आणि तालुक्यातील पाणी टंचाई दूर करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

दारव्हा शहर आणि तालुक्यात सद्यस्थितीत पाणीटंचाई निर्माण झालेली नाही.

दारव्हा नगरपरिषदेस महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत रु. १.०६ कोटी निधी प्राप्त झाला असून त्यामधून पाणीपुरवठा योनजेची कामे प्रगतीपथावर आहे.

(२) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) दारव्हा शहरास टंचाई कालावधीत अरुणावती धरणाचे सोडलेले पाणी उपयोगात आणले गेले. तसेच दारव्हा तालुक्यात पाणी टंचाई निवारणार्थ ५ नविन विंधन विहिरी, ६ नळ योजना विशेष दुरुस्ती, १२ विहीर अधिग्रहण, १ टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा या उपाययोजना घेण्यात आल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

मुंबईतील जे.जे., तसेच औरंगाबाद, पुणे आणि नागपूरच्या मेडिकल मधील बीएस्सी नर्सिंग कॉलेजची मान्यता रद्द केल्याबाबत

(६३) * ७७२७ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे., तसेच औरंगाबाद, पुणे आणि नागपूरच्या मेडिकल मधील बीएस्सी नर्सिंग कॉलेज मान्यता रद्द करण्यांत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणती उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

औरंगाबाद, नागपूर, मुंबई येथील बीएस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रमास मान्यता प्राप्त झाली असून, पुणे करिता मान्यता प्रतिक्षाधीन आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

एसएससी आणि एचएससी बोर्डाच्या परिक्षेसाठी लोडशेडींगच्या कालावधीत जनरेटर घेऊन पर्यायी व्यवस्था करण्याबाबत

(६४) * **८३६२ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण मंडळाच्या एसएससी आणि एचएससी बोर्डाच्या परिक्षेदरम्यान लोडशेडींगच्या भागात शासनाने व परिक्षा मंडळाच्या सर्व केंद्र प्रमुखांनी परिक्षेच्या कालावधीत विजेची पर्यायी सोय म्हणून केंद्रावर जनरेटर व इन्व्हर्टर्स बसविण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने शासनाला माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने जनरेटर भाड्याने घेण्याचे निर्देश दिले असल्यामुळे हजारो रुपये खर्च करुन शाळांनी जनरेटरची व्यवस्था केली, जनरेटरच्या भाड्यासाठी होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात यावी, परंतू या संदर्भात राज्य शिक्षण मंडळ आणि शिक्षणाधिकाऱ्यांकडून परिक्षा केंद्रांना भाडे देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शिक्षण मंडळाकडून परिक्षा केंद्रांना जनरेटर भाड्याची प्रतिपुर्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) जनरेटर भाडयाची प्रतिपुर्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या शाळा इमारतींचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(६५) * ७४३० श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात सन २००८-०९ पासून सर्व शिक्षा अभियांना अंतर्गत बांधण्यात आलेल्या शाळा इमारती बांधकाम हे निकृष्ट दर्जा करण्यात आल्याने सदर शाळांच्या भिंतींना तडे गेल्याचे दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार शाळेच्या इमारतींच्या दुरुस्ती करण्याबाबत तसेच संबंधीत कंत्राटदारावर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर शहरातील जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट न लावणाऱ्या रुग्णालयांवर गुन्हे दाखल करणेबाबत

(६६) * ७४९३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.राजेंद्र जैन, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैव वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट न लावणाऱ्या कोल्हापूर शहरातील ३८७ रुग्णालयांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास महापालिकेला केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील जयंती नाल्यात सुमारे २०० किलो वैद्यकीय कचरा आढळून आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेने संबंधित रुग्णालयाविरुद्ध तसेच राज्यातील इतर ठिकाणी जैव वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट न लावणाऱ्या रुग्णालयांवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) कोल्हापूर महानगरपालिकेने शाहूपुरी पोलीस स्टेशनमध्ये जयंती नाल्यात जैव वैद्यकीय कचरा टाकणाऱ्या अज्ञात व्यक्तिविरुध्द चौकशी व कारवाई करण्यासाठी दि.१९/०५/२०१५ रोजी शाहूपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे एफ.आय.आर. दाखल केला असून शहरातील ३८७ रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत.

त्यापैकी कोल्हापूर येथील २५ रुग्णालयांना जैव वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट न लावल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सूचना दिल्या आहेत.

राज्यात इतर ठिकाणी जैव वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावत असल्यामुळे रुग्णालयाविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पर्यावरणविषयक समितीच्या कामकाजाला शासनाने दिलेली स्थगिती

(६७) * ८१८७ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारने नेमलेल्या पर्यावरणविषयक ना हरकत देणाऱ्या समितीचे कामकाजाला राज्य शासनाने स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थगिती देण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासाठी वेगळी यंत्रणा उभी करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) व (२) राज्य सरकारने नेमलेल्या पर्यावरणाविषयक समित्यांच्या कामकाजाच्या पध्दतीबाबत दि. १०/२/२०१० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशानुसार समित्यांचे कामकाज करण्याबाबत दि. २६/५/५०१५ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) व (४) राज्य सरकारने नेमलेल्या पर्यावरणाविषयक समित्यांचे कामकाज दि. १०/२/२०१० रोजीच्या कार्यालयीन आदेशामध्ये नमूद तरतूदीनुसार व सुरळीतपणे सुरु असल्याने त्यासाठी वेगळी यंत्रणा उभारण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत

(६८) * ६७१६ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न २७७४ ला दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोगस दस्तऐवजाच्या आधारे अनुदानाची शिफारस केली म्हणून उपसंचालक शिक्षण, तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी, नागपूर व तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नागपूर यांच्या विरुध्द उचित कार्यवाहीसाठी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी शिक्षण सचिवांकडे पत्र पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावर शिक्षण सचिवांनी कोणती कार्यवाही केली,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आयुक्त, शिक्षण यांचेकडून स्वयंस्पष्ट अहवाल व अभिप्राय केव्हा मागविण्यात आला,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अहवाल किती दिवसात प्राप्त होणे अपेक्षित आहे तसेच अहवाल प्राप्त होताच शासन या प्रकरणी किती कालावधीत अंतिम निर्णय घेईल ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) व (३) या प्रकरणी शासनामार्फत आयुक्त शिक्षण यांना दि. २०.११.२०१४, दि. १७.३.२०१५ व दि. १६.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करण्याचे कळविण्यात आले आहे.

(४) या प्रकरणी आयुक्त शिक्षण यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचा चौकशी अहवाल दि. २३.३.२०१५ रोजी आयुक्त शिक्षण यांना सादर केलेला आहे. सदर अहवाल पुढील तपासणीकरिता आयुक्त, शिक्षण यांनी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दि. २६.३.२०१५ रोजी पाठविलेला आहे. या अनुषंगाने शिक्षण संचालक, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त करुन आयुक्त शिक्षण यांचा अंतिम अहवाल शासनास प्राप्त झाल्यावर या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येईल.

"बालभारती" ने पुस्तके छापताना अनेक अक्षम्य चुका केल्याबाबत

(६९) * १०५०७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "बालभारती" ने पुस्तके छापताना अनेक अक्षम्य चुका केल्याची बाब माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या वर्षीही दहावीच्या पुस्तकात अरुणाचल प्रदेशचा काही भाग चीनमध्ये दाखविणारा नकाशा बालभारतीने छापला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर्षीही पाचवीच्या पुस्तकामध्ये राष्ट्रगीतांमध्ये छपाईच्या चुका केल्या आहेत, तसेच मुंबईची ७ बेट असा उल्लेख करुन प्रत्यक्षात नकाशात दहा बेट छापली आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, पुस्तकात काही नद्यांची दिशा बदलण्यात आल्याचा दावा मुंबई भूगोल अध्यापक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बालभारतीमार्फत प्रत्येक वर्षी छपाईमध्ये अक्षम्य चुका होत असताना सुध्दा बालभारतीचे संचालक या चुकांबद्दल शासनाकडे अंगुली निर्देश करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासन दोषींवर काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) इ. ५ वी च्या पुस्तकातील नकाशात दोन नद्यांच्या नावात अदलाबदल झाली आहे.

(२) हे खरे आहे. तथापि, याची दुरुस्ती करुन सुधारीत नकाशा सर्व शाळांना पाठविण्यात आला होता.

(३) व (४) पूर्वीच्या मुंबईच्या नकाशामध्ये मुंबईची ७ बेटे दाखवून त्याबाबतची माहिती पाठयपुस्तकात दिलेली आहे. तथापि, याला लागून असणारी ३ बेटे ही नकाशात दाखविली आहे. सदर बेटे काढून टाकणे नकाशाशस्त्रीय दृष्ट्या चुकीचे आहे.

इ. ५ वी च्या परिसर अभ्यास भाग-२ या पुस्तकातील नकाशात युफ्रेटिस व टायग्रीस या नद्यांच्या नावांत अदलाबदल झाली आहे, तथापि सदर बाब सर्व शाळांना कळवून यानुसार बदल करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुलुंड (मुंबई) येथील शिधावाटप कार्यालयावर छापे टाकले असता धान्याच्या साठ्यात तफावत आढळून आल्याबाबत

(७०) * ७८४४ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मुलुंडमधील शिधावाटप कार्यालयावर मा.अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांनी दिनांक ११ मे, २०१५ रोजी छापे टाकले असता धान्याच्या साठ्यात तफावत आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुकानदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१), (२) व (३) मा. मंत्री (अनापुवग्रास) यांनी दिलेल्या मौखिक आदेशानुसार मुंबई मुलुंड मधील शिधावाटप कार्यालयाअंतर्गत असलेल्या एकूण ९ अनधिकृत शिधावाटप दुकानांच्या दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी आकस्मिक तपासण्या करण्यात आल्या,

उपरोक्त तपासण्याच्या अनुषंगाने ९ दुकानापैकी दोन अधिकृत शिधावाटप दुकानांच्या अन्नधान्यांच्या साठयामध्ये तफावत व गंभिर दोष आढळून आल्यामुळे दोन्ही दुकानावर मुलुंड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करुन दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी निलंबित करण्यात आले, तसेच उर्वरित दुकांनाच्या तपासणीत किरकोळ व मध्यम स्वरुपाचे दोष आढळून आल्यामुळे परिमंडळ स्तरावरील चौकशी सुरु आहे.

राज्यामध्ये सन २०१५ मध्ये मेडिकल कॉलेजच्या जागा वाढल्या असल्याबाबत

(७१) * ८४१२ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये सन २०१५ मध्ये मेडिकल कॉलेजच्या जागा वाढल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती कॉलेजमध्ये किती जागा वाढल्या आहेत,

(३) असल्यास, आवश्यक सुविधाअभावी काही कॉलेजच्या जागा वाढल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या कॉलेजला कोणत्या सुविधा नव्हत्या अशा कॉलेजच्या कोणत्या कारणाने जागा वाढल्या नाहीत वा रद्द करण्यात आल्या आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपुर या नवीन महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमाच्या १०० प्रवेक्षमता, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे १ नवीन पदवी वैद्यकीय महाविद्यालय एकूण १५० प्रवेश क्षमता व एका खाजगी विनाअनुदानित संस्थेचे १ नवीन पदवी वैद्यकीय महाविद्यालय एकूण १०० प्रवेश क्षमता तसेच गोदावरी फाऊंडेशनचे डॉ. उल्हास पाटील मेडीकल कॉलेज ॲन्ड हॉस्पीटल , जळगाव (खू) ता. जि.जळगाव या महाविद्यालयाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या ५० प्रवेश क्षमतेसह वाढल्या आहेत.

(३) कोल्हापूर येथील राज्य शासनाच्या अखत्यारितील वैद्यकीय महाविद्यालयात वाढीव ५० जागांना केंद्र शासनाने परवानगी दिलेली नाही.

(४) या महाविद्यालयात प्रामुख्याने अध्यापक संवर्गातील पदांची कमतरता होती. त्यानुषंगाने भारतीय आयुविज्ञान परिषद, नवी दिल्ली यांना त्रुटी पूर्तता अहवाल सादर करण्यात आला होता.

राजभाषेच्या विकासासाठी व दिर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा विभागाची पुनर्रचना करण्याबाबत

(७२) * ९३३९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७३ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजभाषेच्या विकासासाठी व दिर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा विभागाची पुनर्रचना करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) मराठी अभ्यासकेंद्राने राजभाषा मराठी विभागाच्या पुनर्रचनेसाठी पाठविलेला प्रस्ताव माहे एप्रिल २०१० पासून तब्बल दहा वेळा शासनास सादर करुनही अद्यापही तो शासनाच्या लाल फितीत अडकल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मराठी विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी भाषेचा लोकभाषा म्हणून विकास करण्यासाठी व मराठी भाषेची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) नाही.

मराठी अभ्यासकेंद्राच्या प्रस्तावावर शासन स्तरावर झालेल्या बैठकीमध्ये अभ्यासकेंद्राने मराठी भाषा संवर्धनाच्या विविध उपक्रमांच्या विविध कामांची विभागणी सहा उपविभागामध्ये करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि सदर प्रस्तावाच्या संदर्भात मराठी अभ्यास केंद्रासमवेत दिनांक २१.८.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत नवीन उपविभागाकरीता अतिरिक्त मनुष्यबळ देणे शक्य होणार नसल्याचे यापूर्वीच स्पष्ट करण्यात आले आहे.

(३) होय.

मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात अभ्यास करुन राज्य शासनास शिफारशी सादर करण्यासाठी एक समिती गठीत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत सुरू आहे.

(४) राजभाषा अधिनियम १९६४ च्या अनुषंगाने शासन व्यवहारात मराठी भाषेचा प्रभावी वापर करण्याकरीता व भाषा संवर्धनाकरीता मराठी भाषा विभागांतर्गत भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था यांचेद्वारे विविध विकासात्मक उपक्रम सुरू आहेत.

मुंबई, ठाणे, रायगड आणि नवी मुंबई येथील शासकीय गोदामातील रेशनिंगच्या धान्यात झालेला गैरव्यवहार

(७३) * **७३७६ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, रायगड आणि नवी मुंबई येथे रेशनिंगचा गहू, तांदूळ व शालेय पोषण आहाराचा तांदूळ थेट शासकीय गोदामातून हडप करणाऱ्या माफियांसोबत शासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा गहू शासकीय गोदामातील सीसीटीव्ही बंद करुन वाहतुकीचा ठेका घेणाऱ्या ठेकेदारांच्या सबवाहतुकदार आणि डीसीएस अधिकाऱ्यांच्या मदतीने बाहेर काढला जात असून गोदामात याची कुठलीच नोंद नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी नुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती विभागातील १६ तालुक्यांच्या भुजल पातळीत घट झाल्याबाबत

(७४) * **८२५१ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील ५६ पैकी १६ तालुक्यांच्या भूजल पातळीत मार्च, २०१५ पासून सतत घट झाल्याने भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ४५८ गावांसाठी ५८२ उपाययोजनांच्या कामांचा कृती आराखडा विभागीय आयुक्त अमरावती यांनी तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कृती आराखडयातील किती प्रस्तावित उपाययोजनांच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे,

(४) असल्यास, या कृती आराखडयाला किती खर्च अपेक्षित आहे व प्रस्तावित कामे केव्हापासून सुरु करण्यात येणार आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय. अंशतः खरे आहे.

अमरावती विभागातील मागील ५ वर्षाच्या (माहे मे च्या) सरासरी भूजल पातळीशी तुलना केली असता अमरावती विभागात एकूण ५६ तालुक्यांपैकी १० तालुक्यात भूजल पातळीत ० ते १ मि.पर्यंत घट आढळून आली आहे.

वितरीत भूस्तर रचना व भौगोलिक परिस्थितीनुसार विभागातील काही जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे काही भागात टंचाई जाणवत आहे.

(२) अमरावती विभागात पाणी टंचाई कृती आराखड्यानुसार एकूण ३५८६ गावांसाठी ३६८३ योजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या.

अकोला जिल्ह्याच्या पाणी टंचाई कृती आराखड्यानुसार प्रश्नात नमूद ४५८ गावांसाठी ५८२ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या.

(३) अमरावती विभागातील एकूण १३०६ उपाययोजनांच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

(४) या कृती आराखड्याचा एकूण रुपये ४३८०.९८ लक्ष खर्च अपेक्षित आहे. मान्यता दिलेली कामे मान्यता दिलेल्या दिनांकापासून ते ३० जून पर्यंत पूर्ण करावयाची आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील कमी पटसंख्येच्या शाळांबाबत

(७५) * **१०३५२ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या शिक्षण हक्क कायदा २००५ नुसार रत्नागिरी जिल्ह्यात कमी पटसंख्येच्या सुमारे ४७४ शाळा असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा बंद केल्यास सदर शाळेतील शिक्षक व कर्मचारी बेरोजगार होणार असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शाळेतील शिक्षक व कर्मचारी बेरोजगार होऊ नये तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई तसेच आसपासच्या परिसरातील औद्योगिक प्रकल्पांमुळे होणारे प्रदूषण

(७६) * ६९५६ श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई तसेच आसपासच्या परिसरातील औद्योगिक प्रकल्पांमध्ये मोठया प्रमाणात विषारी कचरा निर्माण होतो या कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावता तो नाले, तलाव, नदयांमध्ये सोडला जातो तसेच विषारी धूर वातावरणात सोडल्याने मोठया प्रमाणात प्रदुषण होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे हे पाहता शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोरिवली (मुंबई) येथील एक्सर येथील शाळेची झालेली दूरवस्था

(७७) * ७१८३ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) येथील एक्सर ग्रामस्थांसाठी तत्कालीन मुंबई लोकल बोर्डाने १९४० मध्ये दोनपाखी शाळा बांधली असून शाळेचे छत कोसळायला आले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेच्या दुरुस्तीसाठी शासनाने दहा लाखाचा निधी घोषित केला होता परंतू तो अद्यापही प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शाळेच्या या दूरावस्थेबाबत मुंबई महानगरपालिकेच्या शाळा प्रशासकीय अधिकारी यांना याबाबत माहिती नसल्याने या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) बोरिवली (मुंबई) येथील एक्सर ग्रामस्थांसाठी तत्कालीन मुंबई लोकल बोर्डाने १९४० मध्ये बैठ्यास्वरुपाची कौलारु शाळा इमारत बांधली आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर पंचगंगा नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत

(७८) * ८५७२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर पंचगंगा नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजनांसाठीचा १०८ कोटी ९३ लाखाचा प्रकल्प अहवाल निधीसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवून पाच महिने झाले तरी केंद्राचा निधी रखडला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीवर अवलंबून असलेल्या योजनेतून दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने राज्य शासनाच्या माध्यमातून केंद्राकडे निधी मिळावा यासाठी पाठपुरावा करुन लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) व (२) पंचगंगानदीचे सांडपाण्यामुळे होणारे प्रदुषण रोखण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय नदी कृती योजने अंतर्गत केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयास दिनांक २४.११.२०१४ रोजी पाठविला होता. तथापि केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक २३.१.२०१५ च्या पत्राद्वारे काही त्रुटीची पुर्तता करण्याबाबत

कळविले असून सद्य:स्थितीत शहरी भागातील प्रकल्पाना प्राथम्य क्रम असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे. केंद्र शासनाने कळविलेल्या त्रुटींची पुर्तता जिल्हापरिषद कोल्हापूर यांच्या स्तरावर करण्यात येत आहे. याबाबत पुर्तता करण्यासाठी शासनाने जिल्हापरिषद यांना दिनांक १६.३.२०१५ च्या पत्राद्वारे पुन्हा कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील औषधांच्या किंमतीत तिपट्टीने वाढ झाल्याबाबत

(७९) * ७६५७ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औषधांच्या किंमतीत तिपट्टीने वाढ झाली असून ठराविक औषधेच नियंत्रणाखाली असुन बाकी औषधांवर शासनाचे नियंत्रण नसल्याने कंपन्या मूळ किमतीत कित्येक पट्टीने वाढ करीत असून मूळ किंमतीच्या १० टक्के नफा डिस्ट्रिब्युटर्सना मिळतो तर २० टक्के नफा केमिस्टला मिळतो म्हणजेच मूळ किंमत आणि विक्री किंमत यातील उर्वरित नफा थेट कंपनी आणि डॉक्टरांना मिळत असल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या सत्पाहात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरसकट औषधांच्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

औषधाच्या किमतीवर नियंत्रण ठेवणे व किमती निर्धारित करणे हे केंद्र शासनाचे अधिकार आहेत.

औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ नुसार फक्त किरकोळ औषध विक्रेत्यांना कमीतकमी १६ टक्के नफा मिळावा अशी तरतूद आहे. ठोक औषध विक्रेते व डॉक्टर्स यांना किती नफा मिळावा याबाबत कायद्यात तरतूद नाही.

(२) औषधाच्या किमतीवर नियंत्रण ठेवणे व किंमती निर्धारित करणे हे केंद्र शासनाचे अधिकार आहेत.

अ) औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ नुसार शेडयुला मध्ये अत्यावश्यक औषधांची यादी सन २०१३ मध्ये प्रदर्शित करण्यात आली व एकूण ३४८ अत्यावश्यक औषधांच्या किंमती नियंत्रित करण्यात आल्या व तद्नंतर वेळोवेळी किंमती निर्धारित करण्यात आल्या.

ब) तद्नंतर दिनांक २६.०२.२०१५ रोजी जारी करण्यात आलेल्या अधिसुचनेनुसार इतर औषधांच्या सिलिंग प्राईस तसेच ३४८ औषधांच्या सुधारीत किमती अशा एकूण ५०९ औषधांच्या किमती अधिसुचित करण्यात आल्या आहेत.

औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ अंतर्गत परिच्छेद १० व २० नुसार, शेडयुल व नॉन शेडयुल औषधांच्या किंमतीमध्ये नॅशनल फार्मास्युटीकल प्रायसिंग ॲथॉरिटभ्कडून ठोक महागाई निर्देशांकानुसार दरवर्षी एम.आर.पी.च्या १०% एवढी वाढ करण्याची तरतूद आहे.

राष्ट्रीय औषध मुल्य निर्धारण प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात आलेल्या किमतीपेक्षा जास्त किंमतीने औषध विकल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुध्द अत्र व औषध प्रशासनाकडून कारवाई करण्यात येते व राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरण यांना उत्पादकाने जास्त किंमत आकारल्यास वसुली करण्याबाबत कळविण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माहूर तालुक्यातील बाजारपेठेत, जिल्हा परिषद सर्कल व वानोळा येथे पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

(८०) * ८९३३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील बाजारपेठेत व जिल्हा परिषद सर्कलचे ठिकाण व ३ हजार लोकसंख्या असलेल्या वानोळा येथील ३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला अखेरची घरघर लागली असून मागील पाच महिन्यापासून नळ योजना बंद असून नागरीकांना अर्धा ते एक कि.मी. अंतरावरुन डोक्यावर पाणी आणावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नळयोजना त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.
(२) होय. तपासणी करण्यात आली आहे.
(३) पाणी टंचाई अंतर्गत नळ योजना विशेष दुरुस्ती मौ.वानोळा, ता.माहुर येथील रु. २.३० लक्ष किंमतीचे व वानोळा तांडा योजनेचे रु. ४.३३ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी नांदेड यांना सादर केले असून, त्यावर कार्यवाही चालू आहे. सद्य:स्थितीत वानोळा व वानोळा तांडा येथे पाणीपुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कामा रुग्णालयातील रेडियोथेरेपी तज्ञांची पदे वाढविण्याबाबत

(८१) * ९६३४ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कामा रुग्णालयामध्ये लिनियर एक्सलेटर या आधुनिक मशीनद्वारे सुमारे दिड वर्षापासून कॅन्सरच्या रुग्णांवर रेडियेशन उपचार सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेडियोथेरेपी तज्ञांची कमतरता असल्याने कामा रुग्णालयामध्ये पुरुष कॅन्सर पेशंटना रेडियेशन उपचार पध्दतीपासून वंचित रहावे लागत असल्याची बाब माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयात रेडियोथेरेपी तज्ञांची पदे वाढवून जास्त रुग्णांना सेवा मिळण्याबाबत शासनाद्वारे तातडीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही, कामा रुग्णालय हे माता व बाल रुग्णांकरिता आहे. त्यामुळे पुरुष कॅन्सर रुग्णांना उपचार केले जात नाहीत.
(३) रेडीयोथेरपी विभागासाठी दि. २०/८/२०११ च्या शासन निर्णयान्वये २३ पदे निर्माण करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत या आर्थिक वर्षात ३९ नळ योजनेचे उद्दीष्ट पूर्ण करणेबाबत

(८२) * ८९२० श्री.हरिसिंग राठोड, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत या आर्थिक वर्षात ३९ नळ योजना पूर्ण करण्याचे उद्दीष्ट होते त्यासाठी शासनाकडून १२ कोटी रुपयांचा निधीही देण्यात आला होता, मात्र त्यापैकी केवळ पाच कोटी रुपयांचा निधी खर्च झाला असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी अखर्चित रहाण्याची कारणे काय आहेत, तसेच योजना अपूर्ण का राहिल्या याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

हिंगोली जिल्ह्यात ३९ नळ योजना पूर्ण करण्याचे उद्दीष्ट होते. त्यापैकी ३६ गावांच्या नळ पाणीपुरवठा योजनेचे पाणी सुरु करण्यात आले आहे. सदरील योजनेची उर्वरित कामे पूर्ण करुन योजना पूर्ण करण्याची कार्यवाही चालू आहे. त्यासाठी शासनाकडून एकूण प्राप्त निधी रु. १४.७५ कोटी पैकी रु. ८.७१ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.

(२) सदरील योजनेची कामे दोन वर्षात पूर्ण करावयाची असल्याने पहिल्या टप्प्यातील कामे उद्धव विहीर व उध्दरण वाहिनीची कामे करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. उर्वरित कामाचे ठेकेदारांमार्फत देयक प्राप्त न झाल्यामुळे रु. ६.०४ कोटी निधी अखर्चित आहे व कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कॉलेजला आणि अतिरिक्त तुकडयांना मान्यता देणार नसल्याबाबत

(८३) * ९०४७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण संस्थाचालकांच्या वाढत्या जाळयाला आळा घालण्यासाठी यंदा एकाही नव्या कॉलेजला आणि अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देणार नसल्याचा शासन निर्णय शिक्षण विभागाने काढल्याचे माहे मे २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरसकट सगळया कॉलेजांसाठी हा शासन निर्णय अन्यायकारक असल्याने राज्यात याबाबत तीव्र असंतोष व आंदोलन करण्याचा इशारा सिनेट सदस्यांनी दिल्या आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त शासन निर्णयांवर योग्य निर्णय जाहीर करण्याची मागणी होत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तुकड्यांच्या अतिरिक्त मान्यतेबाबत काढण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) होय, राज्यातील महाविद्यालयात सुमारे २५ टक्के प्रवेशाच्या जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आल्यावरुन विद्यापीठ अधिनियमातील तरतूदीनुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील बृहत आराखडे सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे महाविद्यालयांना मान्यता न देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर सुधारित बृहत आराखडे राज्य उच्च शिक्षण परिषदेसमोर सादर करण्यात येतील व त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

पुणे जिल्हयात तसेच मुंबईत खेळांच्या मैदांनाची जागा खाजगी कार्यक्रमांना व लग्न समारंभासाठी देऊन मैदानाचा दुरुपयोग केल्याबाबत

(८४) * ९५७४ ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा नगरीत खेळापेक्षा लग्न व इतर समारंभ मोठया प्रमाणात होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतही खेळांच्या मैदांनाची जागा जिमखान्यांना खेळासाठी दिलेली असतांना या ठिकाणी खेळापेक्षा खाजगी कार्यक्रमांना व लग्न समारंभासाठी उपयोग केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा खेळाची मैदाने खेळाशिवाय अन्य कार्यक्रमासाठी देण्यात येऊ नयेत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) यासाठी अदयापही कोणत्याच उपाययोजना केल्या नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) व (३) जिमखान्यांना शासनाने मंजूर केलेल्या जमीनीवरील हॉल व लगतची मोकळी जमीन, शासनाने विहीत केलेल्या कालावधीत विवाह/स्वागत समारंभ, प्रदर्शन/मेळावे इत्यादी क्रीडातर प्रयोजनासाठी भाड्याने देण्याकरिता आकारावयाच्या शुल्कासंदर्भातील धोरण शासन परिपत्रक, महसूल वन विभाग क्रमांक एलबीएल-२५०२/११५०५०/प्र.क्र.१४२/ ज-२, दि.०४.०८.२००६ अन्वये विहीत करण्यात आलेले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडून विविध अटी व शर्तीवर जिमखान्याचे हॉल्स व लगतची मोकळी जागा वापरण्यास परवानगी देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी येथील कोकण विभागीय शिक्षण मंडळाची इमारत बांधकामाबाबत

(८५) * ९८३२ ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे कोकण विभागीय शिक्षण मंडळाचे कार्यालयीन कामकाजाचे इमारत बांधकामासाठी गेल्या तीन वर्षापुर्वीच शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुरीनंतर गेल्यावर्षी (माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये) सदर इमारतीचे सभोवताली संरक्षक भिंत बांधण्यासाठी रुपये १३ लाख इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निधी उपलब्ध करुन देऊनही सदर इमारतीचे व संरक्षक भिंतीचे बांधकाम अद्याप सुरु झाले नसल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून निधी प्राप्त होऊन देखील सदर इमारतीचे बांधकाम व संरक्षक भिंतीचे बांधकाम सुरु न करण्याची कारणे काय आहेत तसेच संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) इमारत व संरक्षक भिंतीचे बांधकामाबाबत कार्यवाही सुरु आहे.

हिंगोली जिल्ह्यात शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याबाबत

(८६) * **१००२० श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने राज्यस्तरीय रोस्टर तयार करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, सचिव, शालेय शिक्षण आदीकडे शिक्षक आंतरजिल्हा संघर्ष समितीमार्फत माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) शिक्षकाची पदे ही जिल्हास्तरावरील शिक्षक संवर्गातील पदे असल्याने तसेच शिक्षकांच्या बदल्यांचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने राज्यस्तरीय रोस्टर करणे उचित ठरणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक तसेच दर्जेदार शिक्षण देण्याबाबत पथकाची केलेली नियुक्ती

(८७) * **१०२२३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक तसेच दर्जेदार शिक्षण देण्यासाठी राज्य शासनाने मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद यांच्या नेतृत्वाखाली पथकांची नेमणूक करुन दर्जा राखण्याबाबतची कार्यवाही सन २०१४-१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणीसह मराठवाड्यातील शाळांमधील गुणात्मक व दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी सदरील पथकांनी कोणती कामगीरी पार पाडली आहे, तसेच या शाळांमध्ये गुणात्मक व दर्जेदार शिक्षणात वाढ झाली आहे काय,

(३) नसल्यास, कागदोपत्री पथके स्थापन करुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत तडजोड करणाऱ्या संबंधीत दोषी अधिकारी व पथकांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) तसेच त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) मराठवाडा विभागातील गुणवत्ता वाढीसाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या नेतृत्वाखाली पथक स्थापन करण्यात आले असून गुणवत्ता वाढीसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, माध्यमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल उंचावणे, ई-लर्निंगची सुविधा उपलब्ध करणे, वाचन लेखन, गणित विकास कार्यक्रम, प्रश्न मंजुषा इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

सदर उपक्रमांमुळे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत सन २०१३-२०१४ मध्ये घेण्यात आलेल्या इ.५वी वर्गाच्या सर्वेक्षणात परभणी जिल्ह्याचा मराठी विषयाच्या अध्ययन संपादणुकीमध्ये राज्यात तृतीय क्रमांक आला असून, गणित विषयाची जिल्ह्यातील संपादणूक पातळी ५९.३३ टक्के आहे. तसेच वरील उपक्रमांच्या अंमलबजावणी मुळे मराठवाड्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढली आहे.

(३) व (४) शैक्षणिक गुणवत्ता तपासण्यास्तव जिल्हास्तरावर फिरती पथके स्थापन करण्याबाबतचा दिनांक १८ एप्रिल, २०१३ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबतचा शासन निर्णय दिनांक २२ जून, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यात पथकाची तरतूद नाही.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाने शिक्षक भरतीची प्रक्रिया तातडीने पुर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही

(८८) * ७५८५ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाने विविध व्यवसायातील १००० शिक्षकांच्या भरतीसाठी सप्टेंबर २०१४ पासून भरती प्रक्रिया चालू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागात २००० शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रक्रिया अद्यापपर्यंत पुर्ण झालेली नसल्याने कार्यरत असलेल्या शिक्षकांवर ताण पडत असून विद्यार्थ्यांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, शिक्षक भरतीची प्रक्रिया तातडीने पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(६) अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय,

(२) होय,

(३) नाही, हे खरे नाही.

तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर शिक्षकांची नियुक्ती करुन पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) व (६) सदरहू पदभरती त्रयस्त एजन्सीचे सहाय्य घेवून तातडीने पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासन पुरस्कृत माध्यमिक स्तरावरील अपंग समावेशातील शिक्षक योजनेअंतर्गत विशेष शिक्षकांना वेतन देण्याबाबत

(८९) * ९६०९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २८८१ ला दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:
सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासन पुरस्कृत माध्यमिक स्तरावरील अपंग समावेशातील शिक्षक योजनेअंतर्गत राज्यातील १ हजार ३६५ विशेष शिक्षकांना ४ वर्षापासून वेतन मिळाले नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेतन न मिळाल्याने ४ शिक्षकांनी आत्महत्या करुन जीवन संपविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षकांचे थकित वेतन व आत्महत्याग्रस्त शिक्षकांच्या कुटुंबियांना तातडीने मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.
सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये केंद्र शासनाने पात्र ठरविलेल्या ३२८ विशेष शिक्षकांचे वेतन अनुदान वितरित करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वेतन अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना, वर्ग तुकडयांना व वाढीव पदांना निधी उपलब्ध असतांनाही वेतन अनुदान न मिळाल्याबाबत.

(९०) * ८०६४ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने वेतन अनुदानास पात्र घोषित केलेल्या शाळांना, वर्ग तुकडयांना व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुमारे ९२६ वाढीव पदांना निधी उपलब्ध असतांनाही दिनांक ३१ मार्च, २०१५ अखेर वेतन अनुदान दिले नाही हे खरे आहे काय,

(२) दिनांक ३१ मार्च, २०१५ अखरे शिक्षण संचनालनालयाकडून वेगवेगळया लेखाशिर्षाखाली अखर्चित राहीलेला व शासनास परत आलेल्या वेतन अनुदान निधीची रक्कम किती आहे,

(३) वरील सर्व शाळांना वर्ग तुकडयांना व वाढीव पदांना वेतन न मिळण्यास जबाबदार असलेले अधिकारी कोण आहेत व त्यांचेवर शासनाने काय कारवाई केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय,

(२) विविध लेखाशिर्षाखाली रुपये १६६२३.८३ लक्ष इतका निधी अखर्चित राहीला आहे.

(३) अनुदानास पात्र शाळा/वर्ग तुकडयांना निधीच्या उपलब्धेनुसार अनुदान वितरीत करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कॅन्सर ह्या रोगावर उपचाराकरिता नागपूर येथील शासकिय वैद्यकिय रुग्णालय व महाविद्यालय येथे युनिट सुरू करण्याबाबत

(९१) * ७३५० श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार, श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर येथे कॅन्सर ह्या रोगावर उपचाराकरिता शासकिय वैद्यकिय रुग्णालय व महाविद्यालय येथे कोबाल्ट ह्या जुन्या पद्धतीने उपचार केले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालबाह्य झालेले कोबाल्ट युनिट पुर्नस्थापना करण्यासाठी टी.बी.वॉर्ड परिसरात कॅन्सर टर्शरी युनिट मंजूर करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामाला अद्यापपर्यंत सुरुवात झालेली नसून शासनाकडून या युनिटच्या उभारणीसाठी अद्यापपर्यंत निधीची तरतुद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी उपलब्ध करून युनिट सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) कॅन्सर ह्या रोगावरील उपचाराकरीता शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयात कोबाल्ट पध्दतीचा वापर करण्यात येतो हे खरे आहे.

(२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील कोबाल्ट युनिट कालबाह्य झालेले नाही. तसेच सदर मशीनमध्ये नविन सोर्स स्थापीत करण्यात आला असून त्यामुळे मशीनची गती (रेडीएशन क्षमता) वाढली आहे.

केंद्र शासनाच्या कुटुंब कल्याण विभागामार्फत नागपूर येथे टर्शरी कॅन्सर केअर युनिट स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले असून त्याकरिता टी.बी.वॉर्ड परिसरातील जागेचा उपयोग करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) व (४) टर्शरी कॅन्सर केअर युनि टकरिता केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्याकडून ७५:२५ या प्रमाणात निधी खर्च केला जाणार असून त्या अनुषंगाने प्रस्तावावर कार्यवाही सुरु केला जाणार असून त्या अनुषंगाने प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अन्न व औषध प्रशासन विभागास (एफडीए) २०० अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांची गरज असल्याबाबत

(९२) * ७०२९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एक कोटी पंचवीस लाख नागरीकांना सुरक्षित अन्न मिळावे याची जबाबदारी असलेल्या अन्न व औषध प्रशासनाला (एफडीए) २०० अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांची गरज असून फक्त १९ अधिकाऱ्यांवरच ही जबाबदारी असल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले तसेच राज्यातील औषधांचा दर्जा, गुणवत्ता, उपयुक्तता आणि त्यांचे परिणाम या विषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, औषध बाजारात आणण्यापूर्वी त्याची तपासणी व चाचणी गरजेची असते परंतू अन्न व औषध प्रशासनाकडे आयुर्वेदतज्ञ निरीक्षकांची वानवा असल्याने आणि केवळ एकच निरीक्षक असल्याने राज्यातील अशा औषधांचा दर्जा, गुणवत्ता, उपयुक्तता आणि त्यांचे परिणाम याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, आयुर्वेदिक कंपन्याच्या संख्येनुसार किमान ५० निरीक्षकांची एफडीए ला गरज असल्याने ही रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) हे खरे नाही. तथापि बृहन्मुंबई विभागात अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची ५७ पदे मंजूर असून त्यापैकी २० पदे भरलेली आहेत तसेच मुख्यालयात १७ पदांपैकी ११ पदे कार्यरत आहेत. या संवर्गातील ४८ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे व याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनाच्या आकृतिबंधानुसार तंत्र अधिकारी (आयुर्वेद) हे आयुर्वेद तज्ञ निरिक्षकांचे एक पद मंजूर असून ते भरलेले आहे. तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या सुधारित आकृतिबंध निश्चितीची कार्यवाही करण्यात येत असून, आयुर्वेद तज्ञ निरिक्षक संवर्गात आवश्यकतेनुसार पदे निर्माण करण्याचा विचार करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र शिक्षा निकेतन हायस्कूल, चेंबूर या शाळेच्या मूल्यांकनात तपासणी समितीद्वारे चुकीचे गुणांकन केल्यामुळे शाळा अनुदानासाठी अपात्र केल्याबाबत

(९३) * **७६७० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शिक्षा निकेतन हायस्कूल, चेंबूर (मराठी व हिंदी माध्यम) या शाळेच्या मूल्यांकनात तपासणी समितीद्वारे चुकीचे कमी गुणांकन केल्यामुळे शाळा अनुदानासाठी अपात्र ठरविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आवश्यक ती दुरुस्ती करण्यासाठी शिक्षण संचालकांनी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतच्या प्रक्रीयेबाबतची सदयस्थिती काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) व (३) यासंदर्भात तपासणी समिती प्रमुख यांनी शाळेस प्रत्यक्ष भेट देऊन शाळेची फेरतपासणी करुन मुल्यांकनाच्या शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ व दिनांक १६ जून, २०१३ नुसार शाळेस अनुदानास पात्र ठरविण्याची शिफारस दिनांक २ जुलै, २०१५ रोजी शिक्षण संचालकांकडे केलेली आहे.

डहाणू (जि.पालघर) तालुक्याच्या बंदरपट्टीतील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई

(९४) * ९९८९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्याच्या बंदरपट्टीतील धाकटी डहाणू, तडियाळे, गुंगवाडा, पोखरण, अभ्राम-धूमकेत, वाढवण, वरोर, वासगाव, तणाशी, ओसार, चंडिगाव, आसनगाव, वाणगाव, केतरवाडी, बावडा, कलोली, देदाळे, चिंचणी तसेच तारापूर, घिवली अशा २६ गावांना बाडापोखरण नळपाणी पुरवठा योजनेतंर्गत साखरे धरणातून नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असलेली योजना मागील ३ महिन्यांपासून बंद पडल्यामुळे सदरहू बंदरपट्टी भागातील २६ गावामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नळ पाणीपुरवठा योजनेचे नविन पाईप लाईनसाठी कोट्यावधी रुपये खर्च होवूनही पाणीपुरवठा विभागाच्या हलगर्जी व दुर्लक्षामुळे अद्यापी ५० टक्केही काम पूर्ण झालेले नाही इतकेच नव्हे तर झालेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीविरुध्द कोणती ठोस कारवाई करण्यात आली आहे,

(५) असल्यास, सदरहू बाडापोखरण नळपाणीपुरवठा योजनेतील सर्व दोष सत्वर दूर होऊन योजना लवकरात लवकर पूर्ववत सुरळीतरित्या कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) मौजे बडा-पोखरण, प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे डहाणू व पालघर तालुक्यातील २६ गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. योजनेचे प्रकल्पित वर्ष २००६ असून भौगोलिक परिस्थितीमुळे योजनेच्या ए.सी.पाईप लाईन नादुरूस्तीबाबतचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे या भागातील अनियमित पाण्याचा पुरवठा तसेच वाढती लोकसंख्या विचारात घेवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत नविन योजना राबविण्यात येत असून सदर योजनेची कामे ६५% पूर्ण असून सर्व कामे दिनांक ०५/०९/२०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

मौजे समगा (ता.जि.हिंगोली) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ७० मुलांना झालेली विषबाधा

(९५) * ७७३३ श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे समगा (ता.जि.हिंगोली) येथील जिल्हा परषिदे प्राथमिक शाळेत देण्यात येणाऱ्या शालेय पोषणात पाल शिजवली गेल्याने ७० मुलांना विषबाधा झाल्याने जिल्हा रुग्णालयात दाखल केल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पोषण आहार बनविणाऱ्यांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणती कारवाई केली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) दिनांक ११/४/२०१५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, समगा. ता.जि.हिंगोली या शाळेतील २०३ विद्यार्थ्यांनी शालेय पोषण आहार घेतला होता. त्यापैकी एक विद्यार्थी आहार डब्यातून घरी घेऊन गेला असता आहारामध्ये पाल सदृश्य अंश आढळल्याचे पालकांनी मुख्याध्यापकांना सांगितले. या घटनेची चर्चा झाल्यानंतर १२३ विद्यार्थ्यांना मळमळ व उलटीचा त्रास झाला. सदर विदयार्थ्यांवर तात्काळ उपचार करण्यात आले आहेत.

(३) व (४) सदर आहाराचा नमुना सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे तपासणीसाठी पाठविण्यात आला असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. आहार शिजविणाऱ्या बचत गटाचे काम काढून घेण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या धान खरेदी केंद्राने शेतकऱ्यांना धानाची रक्कम देण्याबाबत

(९६) * ७४४२ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या धान खरेदी केंद्रावर खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या धानाची रक्कम १७ कोटी रुपये दोन महिने होवूनही दिले गेले नसल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केन्द्रावर धान खरेदी करुनही शेतकऱ्यांना त्यांची रक्कम न देण्याची कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) गडचिरोली जिल्ह्यात दि. २७.४.२०१५ अखेर रु. ६८.११ कोटी धानाची खरेदी झालेली असून, त्यापैकी रु. ५२.७३ कोटी शेतकऱ्यांना दिलेले आहेत. १,९०,५६०.०० क्विंटल परिमाणाचे दावे आदिवासी विकास महामंडळाकडून सादर न झाल्यामुळे वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाकडून उर्वरित रकमेची अदायगी झालेली नाही.

सदर रकमेच्या हुंडया अभिकर्ता संस्थेकडून वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयास प्राप्त होताच रक्कम अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील भिडेवाडयाला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करणे बाबत

(९७) * ७४९९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३६४५ ला दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील पहिली मुलींची शाळा पुणे येथील ज्या भिडेवाडयात सुरु झाली त्या वास्तुला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याची मागणी वि.प.स. यांनी दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली त्यानुसार शासनाने या बाबत कार्यवाही करण्याचे निर्देश सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास उक्त प्रकरणी वि.प.स. यांनी सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य यांच्याकडे तात्काळ कार्यवाहीची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वास्तुचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेवून खाजगी मालकाकडून हा वाडा ताब्यात घेवून न्यायालयीन प्रकरणात शासनाच्यावतीने हस्तक्षेप करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) होय.

मा.विधानपरिषद सदस्य यांनी दिनांक १८ मे, २०१५ च्या पत्रान्वये भिडे वाड्यास राष्ट्रीय स्मारक म्हणून दर्जा देण्याची मागणी केली होती. सदर पत्र उचित कार्यवाहीस्तव भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई यांना पाठविण्यात आले आहे.

(३) व (४) सदर वाडा राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याच्या ठराव पुणे महानगरपालिकेने संमत केला आहे. त्यानुसार भूसंपादनाकरीता महानगरपालिका पुणे यांचेमार्फत कार्यवाही सुरू असून महानगरपालिकेने भूसंपादनकरीता रुपये १.३० कोटी इतका निधी शासनाकडे जमा केला आहे. तथापि मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याबाबत याचिका प्रलंबित असून संबंधीत भूसंपादन अधिकारी व पुणे महानगरपालिका यांचेकडून संबंधीत सरकारी वकीलामार्फत न्यायालयात पाठपुरावा करण्यात येत आहे.

आगाखान पॅलेस (पुणे) येथील संग्रहालयातील दुर्मिळ छायाचित्रे खराब झाल्याबाबत

(९८) * ८८६७ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील आगाखान पॅलेसच्या संग्रहालयातील महात्मा गांधीच्या छायाचित्रांसह स्वातंत्र्य लढ्यातील अनेक दुर्मिळ छायाचित्रे खराब झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वास्तूला राष्ट्रीय दर्जा आहे या वास्तूची संपूर्ण जबाबदारी भारतीय पुरातत्व विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली असून केंद्राकडून मिळालेल्या आर्थिक मदतीतून काही कामे पूर्ण करण्यात आली आहे मात्र संग्रहालय व वास्तूच्या डागडूजीची कामे अद्यापही संथगतीने सुरु आहेत हे पाहता राज्य शासन याबाबत आवश्यक आर्थिक मदतीकरीता केंद्र शासनाकडे मागणी करणार वा करत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) आगाखान पॅलेस, पुणे हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून ते भारतीय पुरातत्व सर्वेक्षण महासंचालनालयाच्या अखत्यारीत येते. अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडल कार्यालय, मुंबई यांनी दिलेल्या माहितीनुसार हे खरे नाही.

(२) व (३) अधिक्षक पुरातत्वविद् यांनी कळविल्यानुसार सदर वस्तुसंग्रहालयाच्या वास्तूची जतन व दुरुस्तीची कामे केंद्र शासनाच्या निधीतून पुर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे संग्रहालयाच्या दुरुस्तीसंबंधीचा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही. यामुळे निधीची तरतूद करण्याची आवश्यकता नाही.

सबब राज्य शासनाकडून याबाबत केंद्र शासनाकडे आर्थिक मदतीकरिता मागणी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बोगस डॉक्टर रुग्णांवर उपचार करत असल्याबाबत

(९९) * ९६४७ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध भागात जिल्हा मुख्यालय, तालुका मुख्यालय व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी बोगस डॉक्टर दवाखाने उघडून रुग्णांवर अनाधिकृतपणे उपचार करीत असल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागामार्फत राज्यातील बोगस डॉक्टरांविरुध्द तसेच बोगस डॉक्टरच्या उपचारामुळे जे रुग्ण मृत्यू पावले अशा रुग्णांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) महाराष्ट्र राज्यात सन २०१५ मध्ये (दिनांक ३०.०६.२०१४ पर्यंत) एकूण १०८ प्रकरणांमध्ये अनधिकृत वैद्यक व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिंवर भारतीय दंड संहिता, १८६० व महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ मधील तरतुदींच्या अनुसार कारवाई करण्यात आली आहे. तथापि, अनधिकृत वैद्यक व्यवसायींनी उपचार केल्यामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्यास मयताच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाने रेशनिंगच्या कोट्यात कपात केल्याबाबत

(१००) * १०५२० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने रेशनिंगच्या कोट्यात कपात केल्याने रेशनिंग व्यवसाय तोट्यात चाललेला असल्याने रेशनिंग दुकानदारांनी आत्मदहन करुन आंदोलन करण्याचा इशारा दिल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तुटपुंजे कमिशन मिळत असल्याने रेशनिंग दुकान चालविणे अशक्य झाले आहे, अशा भावना दुकानदारांमध्ये निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कमिशन वाढवून देणे विषयी शासनाने त्वरीत निर्णय घ्यावा अशीही मागणी त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक ५ जुलै, २०१३ पासून देशात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ लागू करण्यचा निर्णय घेतला . राज्यामध्ये दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पासून सदर अधिनियमाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली. सदर अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांना ३५ किलो प्रतिशिधापत्रिका व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना ५ किलो प्रतिलाभार्थी याप्रमाणे अन्नधान्य देण्यात येते. रास्तभाव दुकानातून रु. ३ प्रतिकिलो तांदूळ, रु. २ प्रतिकिलो गहू, रु. १ प्रतिकिलो भरडधान्य देण्याची तरतूद या अधिनियमात आहे. राज्यामध्ये यापूर्वी एपीएल, बीपीएल व अंत्योदय वर्गवारीतील ८७७.१९ लक्ष लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे. केंद्र शासनाने प्रस्तूत कायद्याअंतर्गत अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे. केंद्र शासनाने प्रस्तूत कायद्याअंतर्गत राज्यातील फक्त ७००.१७ लक्ष लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिला आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल (केशरी) मधील १.७७ कोटी लाभार्थ्यांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून पुर्वीच्या एपीएल दराने व परिमाणात माहे मे, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ पर्यंत अन्नधान्य उपलब्ध करुन दिले होते. त्यानंतरच्या कालावधीमध्ये सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२), (३) व (४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्न धान्य वितरणासाठी अधिकृत शिधावाटप /रास्तभाव दुकानांच्या मर्जिन मध्ये रुपये ५० प्रति क्विंटल वरुन रुपये ७० रुपये प्रति क्विंटल अशी वाढ दिनांक ५ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. त्यामुळे रास्तभाव दुकानांच्या कमिशन मध्ये वाढ करण्याचा सध्या कोणताही प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गड-किल्ले यांनी समृध्द असलेल्या राज्यातील अनेक किल्ल्यांना नॅशनल हेरिटेजचा दर्जा मिळण्याबाबत

(१०१) * ८४२८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गड-किल्ले यांनी समृध्द असलेल्या राज्यातील अनेक किल्ले नॅशनल हेरिटेजचा दर्जा मिळण्याच्या पात्रतेच्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॅशनल हेरिटेजचा दर्जा संबंधीत किल्ल्यांना मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.
(२) राज्यातील ४७ किल्ले केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण महासंचालनालयाने राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मराठी भाषा विभागांतर्गत न्याय व्यवहाराच्या मराठीकरणासाठी उपविभाग स्थापन करणेबाबत

(१०२) * ९३४० श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४६७ ला दिनांक १९ मार्च,२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठी भाषा विभागांतर्गत न्याय व्यवहाराच्या मराठीकरणासाठी काम करणारा उपविभाग स्थापन करण्याची मराठी अभ्यास केंद्र व लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी माहे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) दिनांक २१ जुलै, १९९८ च्या अधिसूचनेनुसार राज्यातील जिल्हा व तालुका पातळीवरील न्यायालयांचे शंभर टक्के कामकाज मराठीतून करण्याबाबतच्या निर्णयाची अद्यापही राज्यात अंमलबजावणी झालेली नसल्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच राजभाषा मराठीला मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा म्हणून मान्यता मिळावी, अशी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच बॉम्बे हायकोर्टाचे मुंबई उच्च न्यायालय असे नामकरण करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, प्रश्न भाग (१), (२), (३) व (४) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

मराठी अभ्यास केंद्राने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावामध्ये मराठी भाषा विभागांतर्गत एकूण ६ नवीन उपविभाग निर्माण करण्याचे प्रस्तावित केले असून यामध्ये न्यायव्यवहाराच्या मराठीकरणासाठी काम करणारा एक स्वतंत्र उपविभाग करण्याची मागणी केली. याबाबत संबंधितांबरोबर तत्कालिन उपमुख्यमंत्री यांचेसमवेत दिनांक २१.८.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत नवीन उपिवभागांसाठी अतिरिक्त मनुष्यबळ देणे शक्य होणार नाही ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे. तसेच मराठी भाषा विभागांतर्गत स्वतंत्र उप विभाग स्थापन करण्याची आवश्यकता नसल्याचे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) प्रश्न भाग १-वरील प्रमाणे,

प्रश्न भाग २- शासन निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे.

प्रश्न भाग ३- घटनेच्या ३४८(२) अन्वये मराठी भाषेला उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

प्रश्न भाग ४- बॉम्बे हायकोर्टाचे 'मुंबई उच्च न्यायालय' असे नामकरण करण्याबाबत केंद्र शासनामार्फत कार्यवाही सुरू आहे.

वर्धा जिल्ह्यात अनेक गावात निर्माण झालेली पाणीटंचाई

(१०३) * **८२५२ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिह्यात वाढत्या तापमानामुळे जलस्त्रोत आटत असल्याने माहे मार्च २०१५ पासून अनेक गावात पाणी टंचाई निर्माण झाली असून १६७ गावात पाणी विकत घेण्याची वेळ आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांना टंचाई निवारणार्थ १ कोटी १८ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला असतांना, नागरीकांना पाण्याकरिता वणवण फिरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी टंचाई असलेल्या गावातील नागरीकांना पाणी उपलब्ध व्हावे याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) नाही, हे खरे नाही. वर्धा जिल्ह्यात अशा परिस्थिती उद्भवलेली नाही.

(२) नाही, हे खरे नाही. सन २०१४-२०१५ च्या टंचाई कालावधीत टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या उपाययोजनांवर रुपये ९६.८८ लक्ष खर्च करण्यात आला आहे.

(३) पाणी टंचाई कृती आराखड्यात प्रस्तावित केल्याप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र सरकार अन्न सुरक्षा कायद्यात करीत असलेला बदल

(१०४) * ६९५७ श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकार अन्न सुरक्षा कायद्यात बदल करीत असून या कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या देशातील ६७ टक्के कुटुंबाची संख्या ४० टक्क्यावर आणणार असल्याचे दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था सर्वांसाठी खुली करण्यासह रेशनवर धान्याचे प्रमाण वाढविणे, डाळी व खाद्यतेल देणे यासाठी निर्णय घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) श्री.शांताकुमार, संसद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय अन्न महामंडळाच्या पुर्नरचनेबाबत शिफारस करण्यासाठी केंद्र शासनाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालात लाभार्थ्यांची संख्या ४०% करण्याबाबत शिफारस केली आहे.

(२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मध्ये विहित केलेल्या परिमाणात पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो. सदर परिणामात वाढ करण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारितील नाही. डाळ व खाद्यतेल देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

राज्य शासनाच्यावतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत

(१०५) * ८८१७ **श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने लक्षावधी रुपये खर्च करुन गेट वे ऑफ इंडिया वर मराठी भाषेचा गौरव करण्याचा देखावा केला असुन प्रत्यक्षात मात्र मराठी संवर्धनाकडे दुर्लक्ष केले असुन महाराष्ट्र दिनांच्या निमित्ताने सुरु झालेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उलटून चालला तरी एकाही सरकारी कार्यालय संस्थेत या संदर्भातील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या वतीने दिनांक १ मे, २०१५ ते १५ मे, २०१५ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो. यंदा याबाबतचा दिनांक २ मे, २०१५ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला व त्या अनुषंगाने संबंधीत शासकीय कार्यालये तसेच व्यापारी-खाजगी बॅकांनी हा मराठी संवर्धन पंधरवडा साजरा करण्याचे सूचित केले आहे, तसेच केलेल्या कार्यक्रमांचा अहवाल जून पर्यंत देण्याचेही स्पष्ट करण्यात आले मात्र बहुसंख्य सरकारी विभाग आणि खाजगी संस्थाकडून या निर्णयावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही,

सन २०१४ करीता भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानला जाणारा ''ज्ञानपीठ पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक प्रा.भालचंद्र नेमाडे यांना प्रदान करण्यात आला. ज्ञानपीठ विजेत्यांचा गौरव हा मराठी भाषेचा गौरव असल्यामुळे शासनाच्या वतीने प्रा.नेमाडे यांचा गौरव करण्यासाठी तसेच यापूर्वीचे पुरस्कार विजेते यांचे स्मरण करण्यासाठी ज्ञानपीठ गौरव सोहळा हा कार्यक्रम दि. ७.५.२०१५ रोजी गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित केला होता.

सन २०१३ पासून दि. १ ते १५ मे या कालावधीत प्रतिवर्षी ''मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'' साजरा करण्यात येतो. प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीदेखील मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांना शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या होत्या.

मराठी भाषा विभाग व त्याअंतर्गत सर्व कार्यालयांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

(२) नाही.

दि.१ ते १५ मे या कालावधीत मराठी भाषेशी संबंधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत प्रतिवर्षी सूचना देण्यात येतात. चालू वर्षीदेखील भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत शासनामार्फत सर्व संबंधितांना आवाहन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती जाणून घेण्याकरीता याबाबतचा अहवाल शासनाने मागविला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या हद्दीत ४० नवीन विधी महाविद्यालये सुरु करण्याबाबत

(१०६) * ८५७३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विधी शाखेकडे विद्यार्थ्यांना कल वाढत असल्याने मुंबई विद्यापीठाच्या हद्दीत ४० नवीन विधी महाविद्यालये सुरु करण्याबाबत संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूरी देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ व शासन निर्णय दि. ३०.१०.२०१० अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार विद्यापीठाने प्रस्ताव सादर केले आहेत . तथापि शासनाने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी कोणतेही नविन महाविद्यालय, अतिरिक्त तुकडया, अभ्यासक्रम / विषय व विद्याशाखा मंजुर न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्राप्त प्रस्ताव विद्यापीठांना परत पाठविण्यात आलेले आहेत.

मौजे खोपटी (ता.शिरुर, जि.बीड) गावात स्वजलधारा शासकीय योजनेबाबत

(१०७) * **९९४८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खोपटी (ता.शिरुर, जि.बीड) गावात स्वजलधारा शासकीय योजना सन २००४-०५ पासून सुरु करण्यात आलेल्या येाजने अंतर्गत अल्पशा खर्चाची एकच विहिर खोदली असुन त्याव्यतिरिक्त कोणतेही कामे न करता २५ लक्ष रुपयांपेक्षा जास्त खर्च केल्याचे दाखवून तसेच सन १९९५ पूर्वी शासनाची कायमस्वरुपी नळयोजना अंतर्गत ७ लाखाची झालेली कामे पुढे स्वजलधारा योजनेअंतर्गत केल्याचे कागदोपत्री दाखविले असुन सदरील योजने अंतर्गत पाण्याचा एका थेंबाचाही लाभ गावांना झालेला नसल्याचे माहे जून, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत मौजे-खोपटी (ता.शिरुर, जि. बीड) यांनी दिनांक २६ जानेवारी, २००५ रोजी अविश्वासाचा ठराव आणला, तसेच याबाबत झालेल्या गैरव्यवहारासंबंधी मा कार्यकारी अभियंता यांना दिनांक ४ फेब्रुवारी, २०१४ रोजी ग्रामपचांयत सदस्य श्री. खरमारे यांनी तक्रार अर्ज दिला आहे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. परिषद, बीड यांना पाणीपुरवठा समिती खोपटी मार्फत निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही,

मौ.खोपटी ता. शिरुर कासार या गांवा करिता सन १९९८-९९ मध्ये किमान गरजा कार्यक्रमातंर्गत रु. ७.८६ लक्ष किमंतीची पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली होती. तदनंतर स्वजलधारा कार्यक्रमातंर्गत वर्ष २००४-०५ मध्ये रु. १२.०० लक्ष किंमतीची योजना मंजूर होवून ग्रामीण पाणी पुरवठा समिती खोपटी मार्फत कामे हाती घेवून येाजनेतील समाविष्ट सर्व उपांगे पूर्ण करुन दिनांक ०१.०६.२००६ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला. दिनांक २६.०१.२०१३ रोजी संबंधित ग्राम पंचायत कार्यालयास पुढील देखभाल दरुस्ती करीता हस्तांतरित करण्यात आली आहे व आजही सदर योजनेतून पाणीपुरवठा सुरळीत चालु आहे.

वर उल्लेख केलेल्या दोन्ही योजनेतील उपांगे वेगवेगळया प्रकाराची असून कामामध्ये द्विरुत्ती नाही.

(२) अंशत: खरे आहे.

तात्कालीन सरंपच ग्राम पंचायत खोपटी यांच्यावर दिनांक १३.०४.२००४ रोजी अविश्वासाचा ठराव मंजूर झाल्याचे ग्राम पंचायत खोपटी येथून प्राप्त दस्ताऐवजावरुन दिसून येत आहे. दिनांक ०४.०२.२०१४ रोजी श्री. खरमाटे शेषनारायण संतराम यांनी स्वजलधारा योजनेच्या कामाबाबत तक्रार दाखल केली होती. परंतू उक्त योजना रितसर पुर्ण करुन पाणीपुरवठा सुरळीतपणे चालू करुन दिनांक २६.०१.२०१३ रोजी संबंधित ग्रामपंचायतीस पुढील देखभाल व दुरुस्तीकरीता हस्तांतरीत करण्यात आली आहे व आजही पाणीपुरवठा चालु आहे त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यात वैयक्तिक शौचालय बांधकाम योजनेच्या अनुदान वाटपात झालेला गोंधळ

(१०८) * ८९३७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नांदेड जिल्ह्यात वैयक्तिक शौचालय बांधकाम योजनेच्या अनुदान वाटपात गोंधळ झाल्याच्या तक्रारी आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शौचालय बांधकाम करण्यासाठी शासनाकडून १२ हजार रुपये मिळत असुन ग्रामीण भागात या लोकचळवळीला नागरिकांचे मोठया प्रमाणात सहकार्य मिळत आहे परंतू या बांधकामाच्या प्रत्यक्षात ३० ते ३५ हजार एवढा खर्च येत असुन शासनाकडून मिळणारे १२ हजार रुपयांचे अनुदानही मागील तीन महिन्यांपासून थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करुन दोषांपितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

(२) केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत दि. २ ऑक्टोंबर, २०१४ पासून शौचालय बांधकामाचे अनुदान सुधारित करुन रु. १२,००० इतके करण्यात आलेले आहे. जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत एकुण १३०९ ग्रामपंचायती असून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ५५,५७५ शौचालयाचे बांधकाम झालेले आहे. तसेच मार्च २०१५ नंतर आजपावेतो आणखी २७००० शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. अशाप्रकारे जिल्ह्यात एकूण ८२,५७५ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. यापैकी २९००० लाभार्थ्यांना रु. ३५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच उर्वरित ५३,५७५ लाभार्थ्यांना शौचालयाचे अनुदान रु. ६४ कोटीचे वितरण अद्यापि करावयाचे आहे.

सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात केंद्र शासनाकडून एकूण रु. ६५५.०२ कोटी इतके अनुदान प्राप्त होणे अपेक्षित होते परंतू, प्रत्यक्षात रु. २३६.११ कोटी इतकेच अनुदान प्राप्त झालेले आहे. त्यामुळे मागणीनुसार पूर्ण निधी जिल्हा परिषदांना वितरीत करणे शक्य झाले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

(१०९) * ९०४९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने पाणी व्यापारी पाणी शुध्दीकरणाची कोणतीही प्रक्रिया न करता पाणी विकत असल्याने नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, कोणताही व्यवसाय कर न भरता पाणी व्यापार करणा-यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोंकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत.

(११०) * **९८३९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्या विद्यापीठाअंतर्गत २०० पेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर सदर विद्यापीठाचे विकेंद्रीकरण करता येईल, असा निर्णय सन २०११ मध्ये राज्याच्या मंत्रीमंडळाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाअंतर्गत सध्या ८०० पेक्षा अधिक महाविद्यालये सुरु असल्याने मुंबई विद्यापीठाचे विकेंद्रीकरण करुन, कोंकणवासिय विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र रत्नागिरी येथे कोकण विद्यापीठ रत्नागिरी येथे निर्माण करण्यात यावे, अशी मागणी कोंकण परिसरातील विद्यार्थी व पालक तसेच शिक्षक, शिक्षण तज्ञ गेल्या वर्षापासून ते आजतागायत मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन यांच्याकडे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याप्रकरणी कार्यवाही करण्यात आली आहे काय, नसल्यास कारणे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) होय.

(३) विद्यापीठाचे विभाजन करण्यासाठी डॉ.राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अहवाल विचाराधीन आहे.

विधान भवन :
मुंबई.

उत्तमसिंग चव्हाण
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.